
# वृषाली जोशी

# अंतोन चेकॉव्ह

# कंटाळवाणी गोष्ट



# कंटाळवाणी गोष्ट

मूळ लेखक – स्टीफन झ्वाइग

मराठी अनुवाद – वृषाली जोशी

© वृषाली जोशी

सर्व हक्क अनुवादिकेच्या स्वाधीन. या अनुवादातील कोणताही भाग कोणत्याही माध्यमातून प्रसिद्ध करण्यासाठी अनुवादिकेची पूर्व परवानगी घेण्याची आवश्यकता आहे.

दूरभाष ९९२१७४६२४५

## या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!

# कंटाळवाणी गोष्ट

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो.

मजा येते.

पण

## तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हालाही आनंद मिळेल

**आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.**

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना हे पुस्तक मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# कंटाळवाणी गोष्ट

लेखक : अंतोन चेकॉव्ह

अनुवादिका: वृषाली जोशी

चलभाष : ९९२१७४६२४५

इमेल – vrishalisjoshi@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क अनुवादिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी अनुवादिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशन : ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन :  २० मे २०२१

©esahity Pratishthan®2021

• विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध .

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता .

• हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# अंतोन चेकॉव्ह




१८६० मध्ये रशियात जन्मलेला अंतोन चेकॉव्ह १८८४ मध्ये वैद्यकीय शिक्षण पूर्ण होऊन डॉक्टर झाला. शिकताना आर्थिक कारणासाठी तो प्रसिद्ध मासिकांमधून गोष्टी लिहू लागला. त्यातच त्याला रुची वाटू लागल्याने, त्याने वैद्यकीय व्यवसाय करायचा बेत सोडून दिला. टॉलस्टॉय चेकॉव्हबद्दल

म्हणाला होता, “चेकॉव्ह हा जीवनावर भाष्य करणारा अजोड कलाकार आहे.”

कंटाळवाणी गोष्ट ही एका म्हाताऱ्या माणसाच्या टिपणांवरून बेतलेली प्रसिद्ध गोष्ट आहे. यातील डॉक्टर व वैद्यकशास्त्राचा प्राध्यापक असलेला निकोलाय स्टेपानयच नावाचा वयस्क माणूस त्याच्या आयुष्याच्या उरलेल्या शेवटच्या सहा महिन्यांमध्ये, त्याच्यासमोर उभ्या राहिलेल्या पेचप्रसंगांना कसे तोंड देतो, हे चेकॉव्हने कलात्मक रीतीने मांडले आहे. या प्राध्यापकाला रशियन साहित्य वाचण्यापेक्षा फ्रेंच साहित्यात जास्त रुची असते. कारण त्याला त्यात रशियन साहित्यात अभाव असलेले, व्यक्तीस्वातंत्र्याचा पुरस्कार करणारे प्रतिभापूर्ण लिखाण सापडते. ‘स्मशानापलीकडील अंधाराच्या प्रश्ना’ बद्दल त्याला काही स्वारस्य नसते. ‘शेवटच्या दिवसांमध्ये मला विषबाधा झाल्यासारखे होऊन डास चावल्यासारखे माझे डोके खाल्ले जाणार आहे, हे मला माहिती नव्हते’ असे उद्गार त्याच्या तोंडी चेकॉव्हने घातले आहेत.

# कंटाळवाणी गोष्ट
# एका म्हाताऱ्या माणसाच्या टिपणांवरून



# एक

रशियामध्ये निकोलाई स्टेपॅनोविच नावाचा एक सन्माननीय प्राध्यापक आहे. तो उमराव व छुपा समुपदेशक आहे. त्याने रशियन व इतर देशातील इतक्या पदव्या व सन्मान मिळवले आहेत, की तो जेव्हा त्याची सगळी पदके व मानचिन्हे लावतो, तेव्हा विद्यार्थी त्याला पदकचिन्हांकित असे म्हणतात. गेली पंचवीस तीस वर्षे रशियामधील कोणी उमराव वा प्रसिद्ध अभ्यासक असा नाही, की जो त्याच्या ओळखीचा नाही. आता त्याला कोणी मित्र नाहीत. पण भूतकाळाबद्दल विचाराल, तर त्याच्याजवळील मित्रांच्या यादीत तुम्हाला अनेक सन्मान्य नावे सापडतील. पिरोगोव्ह, कॅव्हेलीन, थोर कवी नेक्रासोव्ह, यांच्याबरोबर त्याची घट्ट मैत्री होती. तो सगळ्या रशियन विद्यापीठांचा व तीन परदेशी विद्यापीठांचा माननीय सभासद आहे आणि असेच अजून काही काही.

या आणि अशा अजून बऱ्याच गोष्टी माझ्या नावाशी संबंधित आहेत. माझे नाव प्रसिद्ध आहे रशियातील प्रत्येक सुशिक्षिताला ते माहिती आहे. परदेशातही ते प्रसिद्ध आहे आणि

मंचावरून नेहमी घेतले जाते. ते अनेक सुदैवी लोकांपैकी आहे. त्याचा दुरुपयोग करणे किंवा काही कारणाशिवाय  लोकांमध्ये घेतले जाणे किंवा छापील स्वरूपात सापडणे, वाईट समजले जाते. कारण खूप आदरपूर्वक रीत्या प्रसिद्ध व संशयातीतपणे उपयुक्त अशा, व्यक्तींशी जवळीक साधणारे, असे ते नाव आहे. मी उंटासारखा प्रामाणिक आणि कामाला वाहून घेतलेला आहे, हे महत्वाचे आहे. आणि त्याहून महत्वाचे म्हणजे मी बुद्धिमान आहे. त्याशिवाय सहज जाता जाता असे म्हटले जाते, की मी उच्चकुलीन, नम्र आणि मान देण्यासारखा माणूस आहे. मी कधीही साहित्यात किंवा राजकारणात माझे नाक खुपसलेले नाही. मी कधी एखाद्या अज्ञानी वा मूर्ख माणसावर, जहरी शाब्दिक टीका केलेली नाही. जेवणाच्या पंक्तीत वा माझ्या मित्रांच्या निधनानंतर स्मशानात मी कधी भाषणे दिलेली नाहीत. माझ्या उच्चशिक्षित नावाला एकही धब्बा लागलेला नाही आणि माझी कशाबद्दलही तक्रार नाही. मी सुखी आहे.

हे नाव धारण करणारा, म्हणजे मी बासष्ठ वर्षांचा टक्कल असलेला, खोटे दात असलेला, चेहऱ्यावरील स्नायूंची हालचाल होणारा, असून माझे नाव सुंदर व बुद्धिमान आहे. तर मी स्वतः कुरूप व मंद आहे. अशक्तपणामुळे, माझे हात आणि डोके

थरथरते. टरगेनेव्ह [ रशियन लेखक ] च्या नायिकांप्रमाणे, माझा गळयात खर्जातील सूर आहेत. माझी छाती आखडलेली असून खांदे अरुंद आहेत. जेव्हा मी बोलतो व वाचतो, तेव्हा माझे तोंड थोडे एका बाजूला वाकडे होते. जेव्हा मी हसतो, तेव्हा माझा पूर्ण चेहरा, म्हाताऱ्या मृत माणसासारखा, सुरकुत्यांनी भरून जातो. कदाचित जेव्हा माझ्या चेहऱ्याचे स्नायु ताठरतात, तेव्हा माझ्या चेहऱ्यावर विशिष्ट भाव येतात. तेव्हा माझी दयनीय आकृती बघून कुणाच्याही मनात असा विचार येतो, की 'हा माणूस लवकरच मरेल.'

पण मी अजूनही चांगले व्याख्यान देतो. एकेका वेळी मी पूर्वीसारखेच, माझ्या श्रोत्यांचे अवधान दोन तास सहज खेचून घेऊ शकतो. माझी व्यक्त होण्याची गुणवत्ता, माझी आकांक्षा आणि माझा विनोद, यामुळे माझे ढोंगी माणसासारखे वाटणारे, कोरड्या, उगीचच वरखाली होणाऱ्या आवाजातील वैगुण्य झाकले जाते. पण माझे लिखाण वाईट आहे. माझ्या मेंदूतील लिखाणाचे केंद्र, काम करण्यास राजी होत नाही. माझी स्मृती खालावली आहे. विचारशक्तीमधील सलगता गेली आहे. प्रत्येक वेळी मी ते कागदावर उतरवायचा प्रयत्न करतो, तेव्हा मला असे जाणवते, की त्यातील सुसंवादाची अंतःप्रेरणा खलास झाली

आहे. वाक्यांची जुळवाजुळव साचेबंद झाली आहे. वाक्प्रचार वापरण्याची खुबी दर्जाहीन व घाबरट झाली आहे. मला जे म्हणायचे आहे, त्यापेक्षा वेगळेच काही मी लिहितो. मी शेवटाकडे येतो, तेव्हा सुरवात विसरतो. मी साधे साधे शब्द नेहमी विसरतो. माझ्या लिखाणातील, गरज नसलेले वाक्प्रचार, कंस, स्वल्पविराम इत्यादी --- यामुळे माझी कमी झालेली मनाची जागृती निदर्शनास येते. आणि उल्लेखनीय रीत्या लिखाण जितके साधे, तितके ते लिहिण्यासाठी ताण घ्यावा लागून छळ होतो. एखादे अभिनंदनपर पत्र किंवा अहवाल लिहिण्यापेक्षा, मला एखादे कसदार व दर्जेदार लिखाण लिहायला नेहमीच जास्त सोपे वाटते. दुसरी गोष्ट म्हणजे, मला रशियनमधून लिहिण्यापेक्षा जर्मन वा इंग्लिशमधून लिहिणे सोपे वाटते.

माझ्या अलीकडील जीवन पद्धतीबद्दल लिहितांना मला अलीकडे जडलेल्या झोप न येण्याच्या विकाराबद्दल लिहिले पाहिजे. जर मला विचारले, की तुमच्या जगण्याचे महत्वाचे पायाभूत घटक कुठले. तर मी सांगेन, झोप न येणे. पूर्वीप्रमाणेच मी मध्यरात्री कपडे काढून अंथरुणात शिरतो. मला पटकन गाढ झोप लागते. पण पुन्हा दोनपूर्वी मी उठतो आणि मला वाटत रहाते, की मी अजिबात झोपलोच नाही. मला उठून दिवा लावावा लागतो.

कारण मी खोलीतल्या खोलीत या कोपऱ्यापासून त्या कोपऱ्यापर्यंत फेऱ्या मारत रहातो. खूप वेळ ओळखीची चित्रे व फोटो बघत बसतो. मी चालून जेव्हा दमतो, तेव्हा मी माझ्या टेबलाशी काही विचार न करता, काही इच्छा न करता स्वस्थ बसतो. जर माझ्या पुढ्यात एखादे पुस्तक पडले असेल, तर ते माझ्याकडून आपसूक पुढे ओढले जाते आणि काही रुचीशिवाय मी ते वाचू लागतो. अशा तऱ्हेने एका रात्रीत मी यांत्रिकपणे ‘पक्षी काय गातो’ असे विचित्र नाव असलेली सबंध कादंबरी वाचून काढली. किंवा मी एक ते हजार आकडे मोजत बसतो. मित्राच्या चेहऱ्यांचे चित्र काढत बसतो. तो मला कधी, कुठे कसा भेटला, ते आठवत बसतो. मला वेगवेगळे आवाज ऐकायला आवडतात. दोन दारे पलीकडे माझी मुलगी लिझा झोपेत भरभर काही बडबडत असते. किंवा माझी बायको, हातात मेणबत्ती घेऊन हॉलमधून येते, तेव्हा तिच्या हातून हमखास काडेपेटी पडते. कधीकधी कपाटाचे दार करकरते. दिव्याची ज्योत फडफडू लागते. हे सर्व आवाज ऐकून, मला त्रास होतो.

रात्री झोप न येणे म्हणजे, तुमच्या वेगळेपणाची दर क्षणाला जाणीव होणे. त्यामुळे मी अधीरपणे मला झोपायचा हक्क नसलेल्या, सकाळ होण्याची व उजाडण्याची वाट बघत रहातो.

अंगणातील कोंबडा आरवण्यापूर्वीचा लांबलचक, कंटाळवाणा वेळ कसाबसा जातो. तो कोंबडा म्हणजे माझ्या दिवसाची छान सुरवात असते. तो आरवला, की मला समजते, की आता तासाभरात खाली हॉलमध्ये झोपलेला नोकर उठेल आणि खोल आवाजात खोकत, काही कारणाने वरती येईल. मग हळूहळू खिडकीबाहेरील हवा निवळत जाऊन रस्त्यावरील आवाज ऐकू येऊ लागतील.

माझा दिवस माझ्या बायकोच्या येण्याने सुरु होतो. केस अजून न विंचरलेली, पेटिकोटमध्ये असलेली पण तोंड धुतलेली, फुलांचा सुवास येणारी व दर वेळी सहजच आले असे सांगणारी, ती येते.

“माफ कर. मी एक मिनिटासाठीच आले आहे --- तू नंतर झोपला नाहीस का?”

ती दिवा मालवते व समोर बसून बोलायला सुरवात करते. मी काही भविष्यवेत्ता नाही. पण ती काय बोलणार आहे, ते मला आधीच समजते. दर सकाळी ते तेच असते. सहसा माझ्या तब्येतीबद्दलच्या काळजीयुक्त चौकशीनंतर, वारसॉमध्ये ऑफिसर म्हणून नोकरी करणाऱ्या आमच्या मुलाबद्दल तिला अचानक आठवते. प्रत्येक महिन्याच्या वीस तारखेनंतर आम्ही त्याला

पन्नास रुबल्स पाठवतो. तोच आमचा बोलायचा मुख्य विषय असतो.

माझी बायको सुस्कारा टाकत म्हणते, “अर्थात, आपल्यासाठी, हे कठीण आहे. पण शेवटी तो स्वतःच्या पायांवर उभा राहेपर्यंत, आपण त्याला मदत करणे, हे आपले कर्तव्य आहे. मुलगा परदेशी आहे. त्याचा पगार अजून कमी आहे. पण तरीही तुम्ही म्हणत असाल तर आपण त्याला पुढच्या महिन्यात फक्त चाळीस रुबल्सच पाठवू. तुला काय वाटते?”

रोजच्या अनुभवाने कदाचित माझ्या बायकोची खात्री व्हायला हवी होती, की आपण दिवसेंदिवस खर्चाबद्दल बोलल्याने तो काही कमी होत नाही. पण माझी बायको अनुभवातून काही शिकत नाही. ती रोज सकाळी आमच्या ऑफिसर चिरंजीवाबद्दल, पावाची किंमत खाली गेल्याबद्दल आणि साखर दोन कोपेकने वाढल्याबद्दल, देवाला दुवा देत असते. आणि हे सर्व ती अशा सुरात सांगत असते, की ती मला काही बातम्या देत आहे.

मी यांत्रिकपणे ऐकून, हो हो म्हणत रहातो आणि बहुधा मी रात्री नीट न झोपल्याने, त्यातून निरुपयोगी, विचित्र, असे काही माझ्या अंगावर येत रहाते.

मला माझ्या बायकोकडे बघून, एखाद्या मुलासारखे आश्चर्य वाटते. मी गोंधळून, स्वतःला विचारतो, “ही वयस्क, मजबूत, काडीइतकाही पैसा न मिळवणारी बाई रोजच्या जगण्याबद्दल, कर्ज आणि गरिबीबद्दल डोळेझाक करून, क्षुल्लक काळजी आणि भीती हळूच व्यक्त करते. फक्त खर्चाबद्दल बोलू शकते --- भाव करण्याबद्दल हसू शकते. एके काळी सडपातळ असणारी, पारदर्शक व चांगल्या मनाची, पवित्र आत्म्याची, सुंदर तीच ती वार्या आहे का, जिच्यावर मी ऑथेल्लोने डेस्डीमोनावर केले, तसे मनापासून प्रेम केले? तीच ही वार्या आहे का, जिने मला एक मुलगा दिला? मी या वयस्क, जाड्या, काडीइतकाही पैसा न मिळवणाऱ्या बाईच्या चेहऱ्याकडे निरखून बघतो आणि माझी वार्या तिच्यात शोधतो. पण तिच्या माझ्या तब्येतीबद्दलच्या काळजीव्यतिरिक्त, पगाराच्या चौकशीव्यतिरिक्त, आता पहिले काही उरलेले नाही. तिच्याकडे बघून मला वेदना होतात. तिला थोडे तरी बरे वाटावे म्हणून तिला जे काही बोलायचे असेल, ते मी बोलू देतो. इतर लोकांकडे बघून, मी पुस्तके न लिहिल्याबद्दल तिला मला जी काही दूषणे द्यायची असतील, ती देऊ देतो.

आमचे संभाषण नेहमी त्याच तऱ्हेने संपते. माझ्या बायकोला अचानक आठवण होते, की मला अजून चहा मिळालेला नाही.

उठत असतांना, ती म्हणते, “मी इथे बसून काय करते आहे? तिकडे टेबलावर चहाची किटली पडलेली आहे आणि मी इथे बसले आहे. मी किती विसराळू झाले आहे!”

ती पटकन उठते. पण दरवाज्याशी थांबून म्हणते,

येगोरला आपले पाच महिन्याचे पैसे द्यायचे राहिले आहेत. पाच महिन्यांनी एकदम पन्नास भरण्यापेक्षा, दर महिन्याला दहा भरणे सोपे आहे!

ती दारातून जाते. परत थांबून बोलते,

“तिथे कुणी नाही. मला आपल्या बिचाऱ्या लीझाची दया येते. ती हरितगृहामध्ये अभ्यास करते. ती नेहमी चांगल्या लोकांमध्ये असते आणि तिचे कपडे कसे असतात? असा कोट घालून जाणे लाजिरवाणे आहे. जर ती दुसऱ्या कुणाची मुलगी असती, तर ठीक होते. पण प्रत्येकाला माहिती आहे, की तिचे वडील प्रसिद्ध प्राध्यापक व छुपे समुपदेशक होते.

अशा तऱ्हेने माझ्या नाव व पदव्यांची मला आठवण करून देऊन, ती जाते. माझा दिवस असा सुरु होतो. याहून बऱ्या पद्धतीने नव्हे.

मी चहा घेत असतांना, लिझा तिचा कोट व टोपी घालून येते. ती हरितगृहामध्ये जायला तयार झालेली असते. ती बावीस वर्षांची आहे. पण लहान, सुंदर दिसते. माझी बायको तरुणपणी दिसायची, तशी ती थोडीशी दिसते. ती नाजूकपणे माझ्या कानशीलाचे व हाताचे चुंबन घेते आणि म्हणते,

“पपा, शुभ सकाळ! तुम्ही कसे आहात?”

लहानपणी तिला आईसक्रीम फार आवडत असे. मी तिला घेऊन नेहमी त्या दुकानात जात असे. आईसक्रीम म्हणजे तिच्यासाठी जगातील सर्वात सुंदर वस्तू होती. करंगळीचे नाव होते पिस्ता, मरंगळीचे व्हॅनीला, मधले बोट होते रास्पबेरीचे आणि असेच! सहसा ती येऊन जेव्हा मला शुभ सकाळ म्हणत असे, तेव्हा मी तिला मांडीवर घेऊन तिची बोटे धरून, म्हणत असे,

व्हॅनीला --- पिस्ता --- रास्पबेरी --- “

आणि आता जुन्या काळासाठी, मी लीझाच्या बोटांचे चुंबन घेऊन पुटपुटलो,

“व्हॅनीला --- पिस्ता --- रास्पबेरी --- “

पण सर्व चुकीचे ठरले. मी आईसक्रीमसारखा थंड पडलो. खजील झालो. जेव्हा माझी मुलगी माझ्याकडे येऊन, माझ्या कानशीलाचे चुंबन घेत असे, तेव्हा मी मधमाशी चावल्यासारखा दचकत असे व कसाबसा हसून माझा चेहरा वळवत असे. मला झोप न येण्याचा विकार जडल्यापासून, एक प्रश्न माझा मेंदू कुरतडतो आहे, की माझी मुलगी मला नेहमी म्हातारा, प्रसिद्ध मनुष्य म्हणून बघते. दुःखाने मी लाजतो, कारण मला नोकराला पगार द्यावा लागतो. ती बघते, की लहानसहान कर्जे फेडायच्या काळजीने, मी माझे काम सोडून, विचार करत, तासनतास फेऱ्या मारत बसतो. पण तिच्या आईच्या नकळत ती कधीच माझ्याकडे येऊन विचारत का नाही, की हे माझे धड्याळ, ब्रेसलेट, डूल, ड्रेस, हे सगळे तुम्ही घ्या व कर्ज फेडा --- तिची आई आणि मी खोट्या कल्पना उराशी बाळगून, आमची गरिबी लपवत असतो. ती संगीत शिकण्यासारखे खर्चिक नाद सोडू शकत नाही का? असे नाही की तिने म्हटले म्हणून मी लगेच तिचे धड्याळ, ब्रेसलेट, डूल, ड्रेस, हे सगळे घेईन. देवदयेने मला त्याची गरज नाही. मला वारसॉमध्ये ऑफिसर म्हणून नोकरी करणारा आमचा मुलगाही आठवतो. तो बुद्धिमान, प्रामाणिक व चांगला मनुष्य आहे. पण तेवढे पुरेसे नाही. मला जर म्हातारे वडील असते, आणि त्याना गरिबीमुळे लाज वाटायची पाळी येत असती, तर मी माझी

ऑफिसरची नोकरी सोडून, रोजंदारीवर काम केले असते. मुलांबद्दलचे असे विचार मला विषारी बनवतात. पण काय करणार? संकुचित विचारांच्या, कडू मन झालेल्या माणसालाच फक्त हे शक्य आहे की सामान्य लोकांच्या विरुद्ध, तो नायक नसल्याबद्दल, वाईट विचारांना थारा न देणे. पण हे पुरे झाले.

पावणेदहा वाजता माझ्या प्रिय मुलांकडे जाऊन मला व्याख्यान दिले पाहिजे. मी कपडे करून, गेली तीस वर्षे माझ्या पायाखालचा झालेल्या माझ्या आठवणींच्या रस्त्याने, चालत रहातो. इथे औषधाचे दुकान असलेले मोठे घर आहे. पूर्वी तिथे बिअर पार्लर असणारे लहानसे घर होते. तिथे मी माझ्या प्रबंधावर विचार केला होता व वार्याला पहिले प्रेमपत्र लिहिले होते. मी ते एका पानावर पेन्सिलीने ‘मोरांच्या गावाची चौकशी’ अशा शीर्षकाखाली लिहिले होते. इथे वाणसामानाचे दुकान आहे. पूर्वी ते एका ज्यू चालवायचा. तो मला उधारीवर सिगरेटी देत असे. नंतर तिथे एक जाडी बाई आली. तिला विद्यार्थ्यांबद्दल प्रेम होते, कारण ती म्हणे, “त्यापैकी प्रत्येकाला आई असते.” आता तिथे एक लाल केसवाला दुकानदार बसलेला असतो. तो अगदी रोखठोक मनुष्य आहे. तो तांब्याच्या किटलीतून चहा पित असे. आणि इथे खूप काळापासून दुरुस्त करण्यायोग्य झालेली

विद्यापीठाची अंधारी दारे आहेत. मेंढीच्या लोकरीचा कोट घातलेला वॉचमन व बर्फाचे ढिगारे! विद्येचे देऊळ हे खऱ्याखुऱ्या देवळासारखेच असेल, अशी कल्पना करणाऱ्या, मोठ्या शहरातून येणाऱ्या नवीन मुलावर, हे दृष्य काही चांगला परिणाम करत नाही. नकारात्मक रशियन इतिहासात, विद्यापीठातील जुनाट इमारती, अंधारी सज्जे, पुटे चढलेल्या भिंती, अपुरा उजेड, गबाळे जिने, बाके आणि स्वच्छतागृह या सगळ्या जागा बघून, एखाद्याचे मत नक्कीच प्रतिकूल बनेल --- आणि ही आमची बाग! मी विद्यार्थी असल्यापासून, ती चांगली वा वाईट, आहे तशीच आहे. मला ती आवडत नाही. तिथे छान शोभेची व काही उंच सुंदर झाडे लावता आली असती. विद्यार्थ्यांच्या शिकायच्या जागेचा परिसर नक्की त्याच्या मनस्थितीवर परिणाम करतो. त्याला जागोजागी, मोडक्या खिडक्या, रुक्ष, वाळकी झाडे, करड्या भिंती तेलकट, मळकट दारे दिसली --- तर मग देवच त्याचे रक्षण करो.

मी दाराशी आल्यावर मला साधारण माझ्याच वयाचा निकोलाय नावाचा एक जुना शिपाई भेटला. तो म्हणाला,

“महाशय, तुम्ही का बरं वाळलात?”

किंवा माझा कोट ओला असेल.

“पावसामुळे का?”

मग त्याने पुढे धावून माझ्यासाठी सगळी दारे उघडली.

कार्यालयात आल्यावर त्याने मला विद्यापीठातील बातम्या सांगत, कोट काढायला मदत केली. विद्यापीठातील सर्व शिपाई व वॉचमन बरीच वर्षे, तिथे चांगले ओळखीचे असल्याने, त्याना आतील सर्व बित्तंबातमी असते. कुलगुरू केव्हा निवृत्त होणार, त्यांच्या जागी कोण येण्याची शक्यता आहे, इत्यादी माहिती त्याना होती आणि बहुतेक, ती सर्व बरोबर ठरत असे. प्रत्येक विद्यार्थ्याच्या चारित्र्याबद्दल ते जे सांगत, ते बव्हंशी खरे असे. कोणी कुठल्या वर्षी प्रबंध सादर केला, तिथे कामावर रुजू झाला, निवृत्त झाला किंवा वारला याची खडानखडा माहिती या जुन्या शिपायाला असे आणि तो नुसते त्या घटनेचे वर्षच नव्हे तर महिना, दिवस व त्याबरोबर घडलेले काही इतर प्रसंगदेखील सांगे. एखाद्याच्या मनात पराकोटीचे प्रेम असल्याशिवाय, तो हे करू शकणार नाही.

विद्यापीठातील परंपरांचा तो रक्षणकर्ता असे. त्याच्या आधी त्या पदावर असलेल्या लोकांकडून त्याने तेथील आयुष्याबद्दलच्या सुरस आणि चमत्कारीक कथा ऐकलेल्या असत. त्यात त्याने त्याच्या सेवाकालातील गोष्टींची भर घातलेली

असे. तुमची इच्छा असेल, तर तो तुम्हाला अनेक छोट्या मोठ्या गोष्टी सांगू शके. सर्व काही माहिती असलेल्या अलौकिक शहाण्या लोकांबद्दल, आठवडेच्या आठवडे न झोपता अथकपणे काम करणाऱ्या उल्लेखनीय लोकांबद्दल, शास्त्राने बळी घेतलेले लोक, बळकट लोकांवर मात करणारे दुर्बल लोक, शहीद झालेले लोक, शहाणे आणि मूर्ख, नम्र आणि गर्विष्ठ, तरुण आणि म्हातारे --- या सर्वांची खऱ्या खोटयाबद्दल शहानिशा करायची गरज नव्हती. तुम्ही गाळून त्यातले हवे ते घेऊ शकत होतात. आपल्या चांगल्या परंपरा आणि खऱ्याखुऱ्या नायकांची नावे, सर्वजण जाणून असत.

आपल्या समाजात वयस्क, बुद्धिमान प्राध्यापकांचा असामान्य विसरभोळेपणा दाखवून देणारे, अनेक प्रसंग सांगितले जातात. त्यातील दोन तीन गृबरबद्दल, माझ्याबद्दल व बाबुखीनबद्दलही आहेत. शिक्षित समाजासाठी ते पुरेसे नसतात. निकोलायला जितके आवडतात, तेवढे जरी समाजातील लोकांना शिकणारे बुद्धिमान विद्यार्थी आवडले असते, तर त्यांनी महाकाव्य, दंतकथा व संतांचे चरित्र, हे थोर साहित्य, या ना त्या स्वरूपात जतन करून ठेवले असते. पण दुर्दैवाने तसे झालेले नाही.

मला बातमी सांगून निकोलायने त्याच्या चेहऱ्यावर गंभीर भाव आणले आणि आम्ही कामावर चर्चा सुरु केली. निकोलाय किती सहजतेने कठीण शब्द वापरतो आहे, हे कुणा परक्या माणसाने पाहिले असते, तर त्याला वाटले असते की हा शिपायाच्या वेषातील कुणी बुद्धिमान व हुशार माणूस आहे. प्रसंगवशात, या शिपाई वगैरे लोकांचे शहाणपण जरा जास्तच सांगितले गेले आहे. हे खरे आहे, की निकोलायला शंभरपेक्षा जास्त लॅटीन नावे माहिती आहेत. तो मानवी सांगाड्यातील हाडे जोडू शकतो, प्रसंगी स्लाइड बनवू शकतो. एखादे मोठे प्रसिद्ध वचन घडाघडा म्हणून दाखवून, विद्यार्थ्यांना हसवू शकतो. पण तो इतका साधा, किंवा गावठीच आहे म्हणा ना, की रक्ताभिसरण संस्थेबद्दल त्याला जेवढी माहिती वीस वर्षांपूर्वी होती, तेवढीच आजही आहे. माझ्या कार्यालयातील टेबलावरील पुस्तकावर वा स्लाइडवर वाकून, मुलांच्या परीक्षेसाठी वा अभ्यासासाठी प्राणी कापणारा, मेहनती, नम्र, हुशार नसलेला, साधारण पस्तिशीचा, टक्कल पडलेला व पोट सुटलेला सरकारी वकील प्योटर इग्नाटिएविच बसलेला आहे. तो सकाळपासून रात्रीपर्यंत काम करतो. खूप वाचतो. वाचलेली प्रत्येक गोष्ट त्याला आठवते --- त्याबाबतीत तो माणूस नाही तर सोने आहे. बाकी सर्व बाबतीत तो गाडीला जुंपलेला घोडा आहे. किंवा दुसऱ्या शब्दात

सांगायचे, तर शिक्षित मूर्ख आहे. हुशार माणूस आणि गाडीचा घोडा, यातील फरक हा आहे, की त्याचे क्षितीज त्याच्या व्यवसायाच्या मर्यादेतील, तोकडे आहे. त्याच्या व्यवसायाबाहेर तो एखाद्या मुलाइतका अडाणी आहे. मला आठवते, एका सकाळी तो माझ्या कार्यालयात आला व म्हणाला,

“कल्पना करा, इतके दुर्दैव आहे. ते म्हणतात की स्लोबेलेव्ह मेला आहे.”

निकोलाय त्याच्याशी वाद घालू लागला पण प्योटर इग्नाटिएविच माझ्याकडे वळून बोलला,

“तो कुठला स्लोबेलेव्ह आहे? दुसऱ्या वेळी --- हे थोडे लवकर झाले. मी जाहीर करतो, की प्राध्यापक पेरोव्ह वारले आहेत. प्रिय वयस्क प्योटर इग्नाटिएविच विचारतो,

“ते काय शिकवत असत?

माझा असा विश्वास आहे की पॅटी थेट त्याच्या कानात गाऊ लागला, जर चिनी लोकांनी रशियावर आक्रमण केले, जरी भूकंप झाला, तरी तो एकही अवयव हलवणार नाही. अगदी थंडपणे त्याच्या वाकड्या डोळ्यांनी सूक्ष्मदर्शक यंत्रातून बघत राहील. थोडक्यात, हेक्युबा राणी [ ग्रीक राणी ] त्याच्यासाठी कोणीच

नाही आहे. तो कोरडाठाक माणूस आहे. तो त्याच्या बायकोबरोबर कसा झोपत असेल, हे मी पैसे देऊन बघायला तयार आहे.

अजून एक गोष्टः शास्त्र चूक असणे शक्यच नाही, ही वेडी समजूत आहे आणि खरे म्हणजे हे जर्मनांनी लिहिले आहे. त्याची, त्याच्या स्वतःबद्दल आणि स्लाईडबद्दल खात्री आहे. त्याची जीवनाची उद्दिष्टे निश्चित आहेत. बुद्धिमान डोक्यांवरचे केस करडे करणारे संशय व अपेक्षाभंग याबद्दल तो पूर्णपणे अनभिज्ञ आहे. सत्ताधीशांना गुलामांसारखे भजणे तो करतो आणि स्वतंत्रपणे विचार करण्याच्या शक्तीची त्याला गरज भासत नाही. त्याला कशावरही बोलायला लावणे, हे कठीण आहे. त्याच्याबरोबर वाद घालणे अशक्य आहे. वैद्यकशास्त्र हे सर्वात श्रेष्ठ शास्त्र आहे, अशी ज्याची बालंबाल खात्री पटलेली आहे, असा तो आहे. तो समजतो की डॉक्टर हे सर्वात उत्तम लोक आहेत, वैद्यकीय पद्धती या सर्वोत्तम पद्धती आहेत. त्यांच्याशी वाद घालून बघा. शास्त्रज्ञ, डॉक्टर आणि एकंदरीत सुशिक्षित लोकांसाठी, सर्व काम हे उच्च प्रकारचे, प्रतिष्ठेचे काम आहे. फक्त जुन्या परंपरेत वैद्यकीय व्यवसाय हा दुष्ट किंवा गुन्हेगारी स्वरूपाचा असा दिसत होता. पण विद्यापीठीय परंपरेत हे सर्व व्यवसाय एकसारखे असून त्यात

फार फरक नाही. पण प्योटर इग्नाटिएविचला हे कबूल करायला जड जाते. यावर तुमच्याशी जगाच्या   अंतापर्यंत वाद घालायला तो एका पायावर तयार असतो.

मला असे स्पष्टपणे दिसते आहे, की भविष्यात तो नक्कीच शेकडो चांगल्या स्लाईड्स बनवेल. संशोधन पेपर्स लिहेल. दहा बारा तरी उत्तम अनुवाद करेल. पण जगाचे काही नुकसान करणार नाही. जगाचे नुकसान करायला तुमच्याकडे कल्पनाशक्ती, शोधक नजर, अंतःप्रेरणा हवी. प्योटर इग्नाटिएविचकडे यापैकी काहीच नाही. थोडक्यात तो शास्त्रात मालक नाही, पण नोकर आहे.

प्योटर इग्नाटिएविच, निकोलाय व मी हळू आवाजात बोलतो आहोत. आम्ही तितकेसे स्वस्थ नाही. दारामागे असलेल्या समुद्रासारखा श्रोतृवृंद जर कुजबुजत असेल, तर तुमच्या मनात काही विशिष्ट भावना तयार होतात. मला रोज सकाळी याचा अनुभव येतो. मी उदासीनतेने कोटाची बटणे लावतो, निकोलायला नको ते प्रश्न विचारतो, उगीच चिडतो --- असे दिसते, की मी भित्रट बनतो. पण हा भित्रेपणा नसून, दुसरे काही आहे. पण मी त्याचे वर्णन करू शकत नाही व त्याला नावही देऊ शकत नाही.

मी गरज नसताना घड्याळात बघून म्हटले,

“ठीक आहे आता आपल्याला जायला हवे.

मग आम्ही, म्हणजे स्लाइड्स किंवा नकाशांचे पुस्तक घेतलेला निकोलाय पुढे, त्याच्यामागे मी आणि माझ्यामागे नम्रपणे मान खाली घातलेला गाडीचा घोडा, असे चालले होतो. किंवा गरज असेल तर, पहिल्यांदा गाडीतील प्रेत, मग निकोलाय इत्यादी. मला बघितल्यावर विद्यार्थी उभे रहातात. मग बसतात. समुद्राची गाज एकदम शांत होते. स्तब्धता पसरते.

मला माहिती आहे, मी आता कशावर व्याख्यान देणार आहे, मी कशी सुरवात व शेवट करणार आहे. माझ्या डोक्यात कुठलेच वाक्प्रचार नाहीत. मला फक्त सभागृहात नजर फिरवावी लागते. [ ते उघडे गोल सभागृह आहे. ] नेहमीप्रमाणे, मी सुरवात करतो, “मागील वेळी आपण या ठिकाणी थांबलो --- “ बराच वेळ माझ्या डोक्यात वाक्प्रचार येत रहातात --- मग मी भराभरा बोलत सुटतो. माझ्या भाषणाचा ओघ कुणीच थांबवू शकत नाही. व्याख्यान असे चांगले पाहिजे, की विद्यार्थ्यांना काही फायदा होईल आणि कंटाळा येणार नाही. तुम्ही बुद्धीमान नसलात तरी चालेल, पण तुम्हाला स्वतःच्या शक्तीबद्दल व ज्यांच्यापुढे तुम्ही बोलत आहात, त्यांच्या शक्तीबद्दल स्पष्ट कल्पना पाहिजे आणि अनुभव घेण्याची एक खुबी पाहिजे आणि तुम्हाला ज्या विषयावर

बोलायचे आहे, त्याचे सर्व मुद्दे तुम्हाला माहिती असायला हवेत. शिवाय तुम्हाला स्वतःबद्दल अभिमान पाहिजे. तुमची निरीक्षणशक्ती चांगली पाहिजे. एक सेकंदाकरता देखील तुम्ही तुमचा त्या विषयातील व्यासंग आणि जाण सोडली नाही पाहिजे.

ज्याने ते गाणे लिहिले आहे, ते शक्यतोवर अर्थासकट नेमकेपणे श्रोत्यांपर्यंत पोचवणे, यासाठी वाद्यवृंद चालवणाऱ्याला एका वेळी अनेक गोष्टी कराव्या लागतात. मिनिटांचा हिशेब ठेवणे, हातातील काठी ठेक्यात हलवणे, गायकांकडे लक्ष ठेवणे, ड्रम, सिंथेसायझर आणि इतर अनेक वाद्यांचा ताळमेळ बरोबर जुळतो आहे ना, हे बघणे, इत्यादी. मी व्याख्यान देतो, तेव्हा तसेच असते. माझ्यासमोर एकमेकांहून भिन्न, एकशे पन्नास चेहरे असतात. तीनशे डोळे मला बघत असतात. या अनेक डोक्यांना मला जिंकायचे असते. विद्यार्थ्यांचे किती लक्ष आहे आणि त्याना किती समजते आहे, यावर माझे लक्ष असेल, तरच तो जनसमुदाय माझ्या ताब्यात रहातो. मला माझी अनेक रूपे, अनेक प्रसंगातून, अनेक तत्वांमधून, माझ्या व इतरांच्या विचारांमधून मांडावी लागतात. त्यासाठी माझ्या आत एक छुपा मदतनीस दडलेला असतो. प्रत्येक वेळी इतक्या विशाल ज्ञानाच्या महासागरातून, सर्वात महत्वाचे काय आहे ते टिपून घेण्यासाठी, मला सावध

असावे लागते. माझे बोलणे व विचार करणे माझ्या विद्यार्थ्यांच्या पचनी पडेल, इतपत गतीने मला समजावून द्यावे लागते. मला त्यांच्यासमोर जे चित्र उभे करायचे आहे, ते त्यांच्यापर्यंत त्याचा एकेक भाग उभा करत बनवावे लागते. आणखी मी काय करतो, तर माझे व्याख्यान म्हणजे एक साहित्यकृती असावी असा प्रयत्न करतो. व्याख्या थोडक्या शब्दात मांडतो. वाक्प्रचार साध्या पण डौलदार शब्दात मांडतो. माझ्याकडे फक्त एक तास चाळीस मिनिटे एवढाच वेळ आहे, हे मी मनात सतत घोकत असतो. थोडक्यात, हे काही सोपे काम नसते. एक शास्त्रज्ञ, शिक्षक व वक्ता या सर्व भूमिका मला निभावायच्या असतात. यापैकी कुठल्याही एकाने उरलेल्या दोघांना झाकोळून टाकलेले चालत नाही.

तुम्ही अर्धा पाऊण तास व्याख्यान दिलेत की विद्यार्थी आढ्याकडे, प्योटर इग्नाटिएविचकडे बघायला लागतात किंवा काहीजण जास्त आरामात बसायचा प्रयत्न करतात. एखादा मनातल्या मनात हसतो --- याचा अर्थ त्यांचे लक्ष ढळलेले आहे. यावर काही उपाय केला पाहिजे. मग मी काही विनोदी बोलतो. सगळे एकशे पन्नास चेहरे जोराने हसतात. त्यांचे डोळे आनंदाने चमकतात. क्षणभरात  जनसागरातून खुसखुस ऐकू येते --- मी

देखील हसतो. सर्वजण ताजेतवाने होतात. मग परत मी माझा विषय सुरु करतो.

व्याखानाइतका आनंद मला वादविवाद, करमणूक किंवा खेळही देत नाहीत. फक्त व्याख्यान देतानाच, मी स्वतःला झोकून देऊ शकतो. तेव्हा मला समजते, की प्रतिभा ही काही फक्त कवींमध्येच नसते. मी कल्पना करतो, की हर्क्युलीसला त्याच्या थोर कृत्यांनंतरही झाला नसेल, इतका आनंद मला मी व्याख्यान दिल्यावर, माझी जी गोड दमणूक होते, त्याने मिळतो.

पण हे पूर्वीचे झाले. आता मला व्याख्यान म्हणजे छळ वाटतो. अर्धा तास होतो न होतो, तोच माझे पाय व खांदे दुखू लागतात. मी खुर्चीत बसतो. पण मला खुर्चीत बसून, व्याख्यान देण्याची सवय नाही. मिनिटाभराने मी उठून उभा रहातो. काही वेळाने परत बसतो. माझे तोंड कोरडे पडते. माझा आवाज घोगरा होतो. डोके कलकलू लागते. माझ्या श्रोत्यांपासून ही अवस्था लपवण्यासाठी मी पाणी पित रहातो. खोकतो. मला सर्दी झाल्यासारखा, सतत नाक शिंकरत रहातो. नको ते विनोद करतो. शेवटी वेळेआधीच थोड्या वेळाची सुट्टी देतो. पण मुख्य गोष्ट म्हणजे मला लाज वाटते.

माझी बुद्धिमत्ता आणि सद्सदविवेक बुद्धी मला सांगते, की मी आता व्याख्याने देण्याचे थांबवावे. त्याना आशीर्वाद देऊन माझी जागा कुणा तरुण माणसाला द्यावी. पण देव मला माफ करो, माझ्या हातून ते होत नाही.

दुर्दैवाने मी तत्वज्ञ नाही व धर्मशास्त्रज्ञही नाही. मला हे कळते, की मी आता सहा महिन्यांपेक्षा अधिक जगणार नाही व आता मी स्मशानापलीकडील अंधार व माझी अस्वस्थ झोप उडवणाऱ्या गोष्टी, यांच्याकडे लक्ष द्यावे. जरी मला हे महत्व पटले असले, तरी पण काही कारणाने मी तिकडे दुर्लक्ष करतो. वीस तीस वर्षांपूर्वी आणि आता मरण जवळ आलेले असतांनाही, मला फक्त शास्त्रात रुची आहे. माझ्या शेवटच्या श्वासापर्यंत माझा हा विश्वास राहील, की शास्त्र हे सर्वात महत्वाचे, सर्वात सुंदर व मानवी आयुष्यात सर्वात गरजेची असलेली गोष्ट आहे. प्रेमाच्या आविष्करणाची ती सर्वात उत्तम पद्धत आहे आणि राहील. फक्त शास्त्रानेच माणूस निसर्गाला जिंकू शकेल. हा विश्वास मुळात चुकीचा व मूर्खपणाचा असू शकेल, पण माझा असा विश्वास आहे, यात माझी काही चूक नाही. माझ्यापुरता तरी मी या विश्वासापासून ढळू शकत नाही. पण मुद्दा तो नाही. मी माझ्यातील त्रुटी मान्य करतो आणि असे समजतो की माणसाला हाडातील

पेशींमध्ये, विश्वाच्या अंतिम उद्दिष्टांपेक्षा जास्त रुची आहे, त्याला विद्यार्थ्यांपासून व व्याख्यानांपासून दूर जाण्यासाठी, मरेपर्यंत थांबून पुरले काय किंवा आधीच पुरले काय, काही फरक पडत नाही.

झोप न येण्यामुळे व इतर शारीरक दुर्बलतेवर मात करण्यासाठी, माझा जो झगडा चालू आहे, त्यासाठी मला काहीतरी विचित्र होते आहे. व्याख्यानाच्या मध्येच माझा घसा दाटून येतो. माझे डोळे झोंबू लागतात. मी भावनामय होतो. मला माझे हात ताणून, जोरात तक्रार करावीशी वाटते. मला जोरात रडावेसे वाटते. कारण माझ्यासारख्या प्रसिद्ध माणसाला अशी शिक्षा दिली आहे आणि सहा महिन्याच्या काळात कुणी दुसरा माणूस या सभागृहाचा नायक असेल. मला ओरडून असे सांगायचे आहे, की माझ्यावर विषप्रयोग झाला आहे. माझ्या आयुष्याच्या शेवटच्या दिवसात, हे असले विचार माझ्या मेंदूला झिणझिण्या आणतात. अशा वेळी माझी परिस्थिती फार बिकट होते. अशा वेळी सभागृहातील प्रत्येकजण घाबरून त्यांच्या खुर्च्यांवरून उड्या मारून, रडत ओरडत पळून जाईल.

अशा वेळी जगणे अवघड आहे.

## दोन

व्याख्यानानंतर मी घरी बसून, काम करतो, मासिके किंवा शोधनिबंध वाचतो किंवा पुढच्या व्याख्यानाची तयारी करतो किंवा काही लिखाण करतो. मी मध्ये मध्ये थांबत काम करतो, कारण मला भेटायला लोक येतात.

घंटी वाजते. एखादा मित्र बोलण्यासाठी थांबलेला असतो. तो काठी व टोपीसकट माझ्या खोलीत येतो व म्हणतो,

"क्षणभर, फक्त क्षणभर बसा! मला फक्त थोडेसे बोलायचे आहे."

सुरवातीला आम्ही एकमेकांना असे भासवतो, की आम्ही फार नम्र आहोत आणि आम्हाला एकमेकांना भेटून फार आनंद झाला आहे. मी त्याला बसायला खुर्ची देतो. तो मला बसायला खुर्ची देतो. आम्ही मुद्दाम एकमेकांच्या कंबरेला स्पर्श करतो. आम्ही एकमेकांच्या बटनांना स्पर्श करतो, जसे काही आम्ही एकमेकांची परीक्षा करत असतो. आणि रागाला घाबरत असतो. आम्ही काही विनोदी न बोलताही हसतो. आम्ही बसून एकमेकांकडे डोकी झुकवून, हळू आवाजात बोलायला सुरवात

करतो. आम्ही आमची मैत्री असल्याचे भासवत रहातो. सर्व प्रकारचे आमचे बोलणे होते जसे की, “तुला असे आढळून, तू खूष झाला असशील त्यामुळे तू सांग,” किंवा

“तुला हे सांगायला मला अभिमान वाटतो.” जर आमच्यापैकी एखाद्याने दुर्दैवी का होईना पण बुद्धिमान विधान केले तर आम्ही हसतो. त्याचे बोलणे संपल्यावर, माझा मित्र अचानक उठून उभा राहतो आणि माझ्या कामाच्या दिशेने त्याची टोपी हलवत, माझा निरोप घेतो. आम्ही पुन्हा एकमेकांना स्पर्श करून, हसतो. मी त्याला पुढील हॉलपर्यंत सोडायला जातो. त्याला कोट घालायला मदत करतो. पण त्याचा मान राखण्यासाठी बाकी सगळे तो करतो. नंतर वॉचमन जेव्हा दार उघडतो, तेव्हा मी बाहेर येण्याची तयारी दाखवल्याने, तो मला सर्दी होण्याची खात्री देतो. शेवटी मी माझ्या अभ्यासिकेत जेव्हा परत येतो, तेव्हा बहुधा जडत्व आल्याने माझा चेहरा हसरा बनतो.

नंतर थोड्या वेळाने परत घंटी वाजते. पुढील हॉलमध्ये कुणीतरी येते. बराच वेळ तो त्याचा कोट वगैरे काढत रहातो. खोकतो. वॉचमन सांगतो, की एक विद्यार्थी आला आहे. मी त्याला आत पाठवायला सांगतो. मिनिटाभराने एक आल्हाददायक दिसणारा तरुण आत येतो. एक वर्षापूर्वीपासून

आमचे संबध ताणलेले असतात. त्याने मला परीक्षेत उद्धट उत्तरे दिलेली असतात. मी त्याला नापास केलेले असते. दर वर्षी मी साधारण सात विद्यार्थ्यांना, त्याच कारणाने नापास करतो. आजारपणामुळे परीक्षेला बसू न शकलेले विद्यार्थी, नापासाचा शिक्का सहन करतात व त्याबद्दल काही वाद घालत नाहीत. त्यांचा मी दयाबुद्धीने विचार करतो. पण ज्यांच्या सतत सिनेमे बघण्यावर गदा येते व दिनक्रम बिघडतो, त्या चढेल स्वभावाच्या, माझ्या घरी येऊन वादावादी करणाऱ्या विद्यार्थ्यांची मी काही गय करत नाही.

मी त्या विद्यार्थ्याला म्हणतो, "बस. तुला काय म्हणायचे आहे?"

तो चाचरत, माझ्याकडे न बघता म्हणतो, "सर, तुम्हाला त्रास देतो आहे, म्हणून माफी मागतो. मी तुमच्याकडे यायचे धाडस केले नसते --- मी पाच वेळा परीक्षा देऊन, नापास झालो आहे. आता यावेळी माझ्यावर कृपा करून, मला पास करा, कारण --- "

सगळे आळशी विद्यार्थी त्यांचे नेहमीचे जे गाऱ्हाणे सांगतात, ते तो सांगतो, "इतर सर्व विषयात तो चांगले गुण मिळवून पास झाला आहे व फक्त माझ्या विषयात नापास झालेला आहे. हे

नवलपूर्ण आहे. कारण मी तर त्या विषयाचा चांगला अभ्यास केलेला होता आणि मला त्याची खूप माहिती आहे. जर मी नापास झालो असेल, तर ते काही स्पष्ट न करता येण्यासारख्या गैरसमजामुळे झाले असेल.”

मी त्याला म्हणतो, “मित्रा, असे बघ, मी तुला पास करू शकत नाही. परत अभ्यास करून ये. मग आपण बघू.”

शांतता पसरते. त्याला बिअर आणि सिनेमे अभ्यासापेक्षा जास्त आवडत असल्याने, त्याला कडक शब्दात सुनावायचे ठरवून, मी एक सुस्कारा टाकून म्हणतो, “माझ्या मते, तू वैद्यकीय शिक्षण सोडून द्यावेस, ते बरे. तुझा एकंदर आवाका बघता, तू परीक्षेत पास होऊ शकत नाहीस. तुला डॉक्टर होण्याची इच्छा नाही आणि सवडही नाही.”

त्या हट्टी मुलाचा चेहरा लांब होतो.

तो मोठे हसू हसत म्हणतो, “सर, मला माफ करा. पण माझ्या बाबतीत हे असले काही बोलणे विचित्र आहे, की पाच वर्षे अभ्यास करून अचानक ते --- सोडून देणे!”

त्या हट्टी मुलाचा चेहरा लांब होतो.

“तुला जे आवडत नाही, ते करण्यात सगळे आयुष्य फुकट जाण्यापेक्षा, पाच वर्षे फुकट गेलेली परवडतील.”

पण मला एकाएकी त्याची कणव येऊन, मी घाईने बोललो, “तरी शेवटी निर्णय तुझाच असेल. तेव्हा अजून थोडा अभ्यास कर आणि परत ये.”

तो आळशी विद्यार्थी खोल गेलेल्या आवाजात विचारतो, “कधी?”

“तुला पाहिजे तेव्हा, उद्यासुद्धा!”

त्याच्या दयार्द्र डोळयात मी वाचतो, “ठीक आहे. मी येतो. पण तुम्ही दुष्टपणे मला परत हाकलून द्याल.”

मी म्हणालो, “अर्थात, अजून पंधरा वेळा परीक्षा देऊनही, तू अजून ज्ञान मिळवू शकणार नाहीस. पण त्यामुळे तुझे चारित्र्य पक्के होईल. आणि त्याचेच आभार मान.”

तिथे फारच शांतता पसरली. मी तो जाण्याची वाट बघत उठलो. पण तो खिडकीतून बाहेर बघत तिथेच उभा राहिला. त्याची लहानशी दाढी ओढत, विचार करत राहिला. ते कंटाळवाणे झाले.

त्या हट्टी मुलाचा आवाज रसपूर्ण व चांगला होता, डोळे बुद्धिमान पण फसवे होते.

चेहऱ्यावरून, तो चांगल्या स्वभावाचा वाटत होता. पण सतत दारू पिण्याने व सोफ्यात लोळत पडल्याने, थोडा थुलथुलीत झाला होता. तो मला नक्कीच सिनेमाबद्दल, त्याच्या लैंगिक साहसांबद्दल व त्याच्या आवडत्या मित्रांबद्दल उत्कंठापूर्ण गोष्टी सांगू शकला असता. मी त्या उत्सुकतेने ऐकल्याही असत्या. पण दुर्दैवाने असे काही झाले नाही.

“सर मी तुम्हाला शब्द देतो, की तुम्ही मला पास केले तर मी – “

“मी तुम्हाला शब्द देतो, हे ऐकल्यावर मी हात हलवून, खाली बसलो. त्याने क्षणभर विचार केला आणि मलूलपणे बोलला,

“असे असेल तर, अच्छा. मला माफ करा.”

“ठीक आहे, माझ्या मित्रा. चांगला हो.”

तो खात्री नसल्यासारखा, पुढच्या हॉलमध्ये चालत जातो. कोट चढवतो आणि  बाहेर जाऊन, परत बराच वेळ विचार करत बसतो. मला म्हातारडा असे म्हणण्याशिवाय तो काही करू शकत

नव्हता. तो एका वाईट हॉटेलात जातो. बिअर पिऊन जेवतो. आणि मग झोपायला घरी जातो. “अरे प्रामाणिक कामगारा, तुझ्या आत्म्याला शांती मिळो.”

आता तिसऱ्यांदा घंटी वाजते. नवीन काळा सूट व सोनेरी कड्यांचा चष्मा घातलेला आणि पांढरा टाय लावलेला एक तरुण डॉक्टर आत येतो. तो स्वतःची ओळख करून देतो. मी त्याला बसायला सांगतो व विचारतो, की मी त्याच्याकरता काय करू शकतो. तो शास्त्राचा धर्मगुरू भासणारा तरुण डॉक्टर शांतपणे मला सांगायला सुरवात करतो, की तो यावर्षी तो त्याची डॉक्टरीची परीक्षा उत्तीर्ण झाला आहे. पण फक्त शोधनिबंध लिहीणे राहिले आहे. त्याला माझ्याबरोबर, माझ्या देखरेखीखाली काम करायला आवडले असते. त्यासाठी मी त्याला विषय सुचवल्यास, तो उपकृत होईल, असे तो म्हणत होता.

मी म्हणालो, “मला असे करायला आनंद होईल. पण प्रथम आपण शोधनिबंध म्हणजे नक्की काय याबद्दल एकवाक्यता करू. मान्यताप्राप्त समजुतीप्रमाणे, हे स्वतंत्रपणे केलेले एक लिखाण आहे. नाही का? दुसऱ्याने दिलेल्या विषयावर व दुसऱ्याच्या मार्गदर्शनाखाली केलेले काही, शोधनिबंध कसे ठरेल? ---

तो गप्प राहतो. मी उठून उभा राहतो.

मी रागाने ओरडतो, "मला समजत नाही, तुम्ही सगळे माझ्याकडे का येता? मी काय दुकान उघडले आहे का? मी काही विषय वगैरे सुचवत नाही. मी हजार वेळा तुम्हाला सांगितले आहे, की मला शांत बसू दे. माझ्या या बोलण्याबद्दल, मला माफ कर. पण मी या प्रकाराला अगदी कंटाळून गेलो आहे."

तो शांत आहे. फक्त त्याच्या गालांवर थोडा लाल रंग दिसतो. माझ्याबद्दल त्याच्या मनात बराच आदर असलेला दिसतो. पण त्याच्या डोळ्यांवरून मला समजते, की माझ्या बोलण्याचा, माझ्या हडकुळ्या शरीराचा व उदास हावभावांचा तो धिक्कार करत आहे. माझा चिडकेपणा त्याला अस्थायी वाटतो आहे.

मी रागाने म्हणतो, "मी काही दुकान चालवत नाही. आणि हे आश्चर्य आहे. तुम्ही स्वतंत्र का होत नाही? तुम्ही स्वातंत्र्याच्या इतके विरुद्ध का आहात?"

मी खूप बोलतो. पण तो गप्प बसतो. शेवटी मी शांत होतो आणि माझा मुद्दा सोडून देतो. एका तरुण डॉक्टरला शोधनिबंधाचा विषय मी सुचवायचा व तो कुणालाही गरज नसलेला शोधनिबंध त्याने माझ्या मार्गदर्शनाखाली लिहायचा, हे

काही बरोबर वाटत नाही. त्यामुळे त्याला कंटाळवाणे सादरीकरण करून, प्रतिष्ठीत पदवी मिळेल. पण त्याचा उपयोग काय?”

असे अनेक प्रसंग सांगता येतील. पण मी त्यापैकी फक्त चार सांगतो. चौथ्यांदा घंटी वाजते. मला ओळखीचा पदरव येतो. वस्त्रांची सळसळ व नाजूकसा आवाज ---

अठरा वर्षांपूर्वी, सात वर्षाची मुलगी कात्या व सात हजार रुबल्स मागे ठेवून, माझा डोळयांचा डॉक्टर असलेला मित्र वारला. त्याचा इच्छापत्रानुसार, मी त्या मुलीचा पालक झालो. कात्या दहा वर्षांची होईपर्यंत माझ्या कुटुंबात राहिली. मग तिला निवासी शाळेत पाठवण्यात आले. मग ती फक्त उन्हाळयाच्या सुट्टीत माझ्याकडे येत असे. तिला वाढवण्यात वेळ खर्च करणे, मला शक्य नव्हते. मी तिला फार थोडा वेळ बघत असे. त्यामुळे तिच्या बालपणाविषयी मी फार काही सांगू शकणार नाही.

माझ्या आठवणीतील मी प्रेम केलेली पहिली गोष्ट काय असेल, तर ती ही आहे की --- मोठ्या विश्वासाने ती माझ्या घरी आली. आणि तिने स्वतःला माझ्यासारख्या डॉक्टरांच्या हवाली केले. ते तिच्या चेहऱ्यावर नेहमी दिसे. ती पट्ट्या लावलेल्या गालांनी कुठेही बसलेली असली, तरी ती लक्ष देऊन कशाकडे तरी बघत असायची.

नंतर जर तिने मला पुस्तक वाचतांना किंवा काही लिहितांना पाहिले, माझी बायको शेजारून घाईघाईने जात असेल, स्वयंपाकघरात बटाटे सोलत असेल, कुत्रा खेळत असेल, तर तिचे डोळे नेहमी तेच भाव प्रदर्शित करत, जसे की ‘या जगात जे जे चालू आहे, ते सुंदर आणि शहाणे आहे.’ ती चौकस होती व तिला आमच्याशी बोलायला फार आवडत असे. ती माझ्यासमोर बसून माझे निरीक्षण करे. माझ्या हालचाली बघे. प्रश्न विचारे. मी काय वाचतो, विद्यापीठात काय करतो, मी भुतांना घाबरतो का, मी माझ्या पगाराचे काय करतो, याबद्दल तिला कुतूहल असायचे.

ती विचारी, “विद्यापीठात विद्यार्थी मारामारी करतात का?”

हो. लाडके, ते मारामारी करतात.”

“तुम्ही त्यांना गुडघ्यांवर बसवता का?”

“हो.”

विद्यार्थी मारामारी करतात आणि मी त्यांना गुडघ्यांवर बसवतो, हे तिला मजेशीर वाटते. ती हसते. ती शांत, धीराची व दयाळू मुलगी आहे. मी असे क्वचितच तिच्याबरोबर बोलत असे. नाहीतर तिला विनाकारण शिक्षा होत असे. किंवा मग तिच्या चौकस बुद्धीचे समाधान होत नसे. अशा वेळी तिच्या

चेहऱ्यावरील सतत असणारे विश्वासपूर्णतेचे भाव कमी होऊन तिथे उदासी उमटे --- एवढेच. मी तिचे समाधान करू शकत नसे. पण तिला उदास पाहून, मला तिची कीव येई. मग मी तिला जवळ ओढून प्रेमळ दाईच्या सुरात बोले, "बिचारी माझी अनाथ मुलगी!"

मला हेही आठवते आहे, की तिला चांगले ड्रेस घालायला व त्यावर सेंट मारायला आवडायचे. त्या बाबतीत ती माझ्यासारखी होती. मलाही छान कपडे आणि चांगले सेंट आवडायचे.

तिच्या वाढीच्या वयानुसार कात्या चौदा पंधरा वर्षांची होऊन, तिच्यात ज्या नवभावना उमलू लागल्या, त्याकडे लक्ष द्यायला मला वेळ नसल्याची मला खंत वाटते. मी तिच्या थिएटरबद्दलच्या गाढ प्रेमासंबधी बोलतो आहे. ती निवासी शाळेतून सुट्टीत जेव्हा घरी आली आणि आमच्याबरोबर राहू लागली, तेव्हा ती अगदी मनापासून नाटके, सिनेमे आणि नटनट्या यातून मिळणाऱ्या आनंदाव्यतिरिक्त काहीच बोलेना. तिच्या त्या सततच्या बोलण्यांनी आम्हाला नकोसे केले. माझी बायकोमुले, तिचे काही ऐकेनात. तिच्याकडे लक्ष देणे नाकारण्याचे धैर्य माझ्यात नव्हते. जेव्हा तिचा अफाट आनंद ती

वाटू बघे, तेव्हा ती माझ्या अभ्यासिकेत येऊन मोठ्या आवडीने सांगे,

“मला तुमच्याबरोबर थिएटरबद्दल बोलू दे.”

मी घड्याळाकडे निर्देश करून, म्हणे,

“मी तुला अर्धा तास देतो. चल सांग.”

नंतर ती घरी तिला आवडणाऱ्या नटनट्यांची डझनावारी चित्रे आणू लागली. नंतर ती प्रायोगिक रंगभूमीवर कामे करू लागली. आणि शेवटी तिची शाळा संपली, तेव्हा तिने सांगून टाकले की नटी होण्यासाठीच तिचा जन्म आहे.

मी कधीच कात्याच्या थिएटरच्या वेडाबद्दल आस्था दाखवली नाही. माझ्या मते जर नाटक सिनेमा चांगला असेल, तर त्यातील नटनट्यांच्या भूमिकांची फारशी काळजी करायचे कारण नसते. ते नुसते वाचायचे असते. आणि ते जर चांगले नसेल, तर नटनट्यांनी कितीही चांगली भूमिका केली, तरी ती चांगली ठरणार नाही.

माझ्या तरुणपणी मी नेहमी थिएटरमध्ये जायचो. आता माझे कुटुंब वर्षातून दोनदा बॉक्सची तिकिटे काढते व मला

त्यांच्याबरोबर घेऊन जाते. अर्थात त्यामुळे एखाद्याला असा हक्क मिळत नाही, की त्याने थिएटरबद्दल मतप्रदर्शन करावे.

पण मी त्याबद्दल थोडे बोलणार आहे. तीस चाळीस वर्षांपूर्वी थिएटर जसे होते, तसेच आजही आहे. त्यात काही सुधारणा झालेली दिसत नाही. पूर्वीप्रमाणेच, मला कुठे मोकळ्या पॅसेजमध्ये किंवा इतर ठिकाणी स्वच्छ काचा दिसत नाहीत. पूर्वीप्रमाणेच, जरी तेथे थंडी असली तरी गरम कोट घातल्याबद्दल, तीव्र नापसंती दाखवत, मला दारवानाला वीस कोपेक दंड द्यावा लागतो. पूर्वीप्रमाणेच, मध्यंतरात ते उगीचच गाणी लावून ठेवतात. आणि सिनेमाबद्दलची उगीचच नको असलेली नवीन मते लादतात. पूर्वीप्रमाणेच, लोक मध्यंतरात बाहेर जाऊन, सोडायुक्त पेये पितात. लहानसहान गोष्टींमध्येदेखील काही सुधारणा दिसत नाही. तर मोठ्या गोष्टींमध्ये कसली अपेक्षा करणार! पायापासून डोक्यापर्यंत थिएटरच्या परंपरेप्रमाणे वेषभूषा करून, साधे सोपे स्वगत ‘‘मुंग्यांनी मेरू पर्वत तर गिळला नाही ना’’ हे काही कारणाने नको त्याप्रकारे तावातावाने शरीर हलवून, नट उच्चारतो व मूर्खांशी नको इतके बोलून आणि मूर्ख स्त्रियांवर प्रेम करून शहाण्या लोकांना दुःख देऊन, हे कंटाळवाणे नाटक नसल्याचे भासवतो, तेव्हा मला चाळीस वर्षांपूर्वी पाहिलेल्या

बेकार नाटकांची आठवण येते. तेव्हा मी दर्जेदारपणे जोराने ओरडून छाती पिटत असे. आणि प्रत्येक वेळी मी आत शिरत असे, त्यापेक्षा जास्त सनातनी पद्धतीने बाहेर पडत असे.

भावनाशील व भोळसर मनाच्या प्रेक्षकांना ते पटवू शकतील, की अशा प्रकारचे थिएटर म्हणजे एक प्रकारची शाळाच आहे. पण कुणीच खऱ्या अर्थाने, तसे समजू शकत नाही. मला माहिती नाही, की अजून पन्नास शंभर वर्षात काय होईल, पण सध्याच्या परिस्थितीत, थिएटर म्हणजे फक्त करमणूक आहे. पण ही करमणूक फार महाग आहे. ती या देशातील लाखो तरुण, सुदृढ, व बुद्धीमान स्त्रीपुरुषांना लुबाडते, जे याच्या नादी लागले नसते, तर चांगले डॉक्टर, शेतकरी, शिक्षक वा सैन्यातील अधिकारी झाले असते. ते लोकांचा संध्याकाळचा वेळ फुकट घालवतात. तो वेळ ते मित्रांबरोबर गप्पा मारण्यात वा काही मानसिक चांगल्या छंदात गुंतवू शकले असते. ते पैसे फुकट घालवून, खून, डाके व गुन्हेगारी दृष्ये चुकीच्या पद्धतीने मंचावर वा पडद्यावर दाखवून, वर स्वतःचे नैतिक अधःपतन घडवून आणते.

पण कात्याची मते वेगळी होती. तिने माझी खात्री पटवून दिली, की हल्लीच्या दिवसातही, थिएटर हे नाटकांपेक्षा, पुस्तकांपेक्षा व जगातील कशाहीपेक्षा श्रेष्ठ आहे. सर्व कलांना

सामावणारा, असा थिएटर हा मोठा शक्तिशाली स्त्रोत आहे. आणि नटमंडळी ही मिशनरी आहेत. कला किंवा शास्त्र यांचा इतका परिणाम होत नाही, जितका थिएटरचा होतो. त्यामुळेच साधारण वकुबाच्या नटांना बुद्धीमान लोकांपेक्षा व कलाकारांपेक्षा फार जास्त प्रसिद्धी मिळते. थिएटरइतके समाधान व आनंद इतर कुठल्याच सामाजिक गोष्टीकडून मिळत नाही.

एका छान सकाळी कात्याने एक नाटकाच्या तुकडीत प्रवेश घेतला व तिच्याबरोबर भरपूर पैसे घेऊन, उज्वल भविष्याची अपेक्षा करत व भपकेबाज कल्पना उराशी बाळगून, ती Ufa [unrestricted free agent ] [अनोंदीत स्वतंत्र दलाल ] म्हणून रवाना झाली.

वाटेतून आलेली तिची पहिली पत्रे असाधारण होती. ती वाचून मी आश्चर्यचकित झालो. त्या लहानशा पत्रात इतका उत्साह, अंतरीक शुद्धता, पवित्र निरागसता, याबरोबर कोमल निश्चय भरलेला होता, की त्यातून चांगले कणखर मन दिसत होते. तिचे मित्र, तिने भेट दिलेली व्होल्गा वगैरे ठिकाणे, तिचे यश आणि अपयश --- तिने त्याचे इतके वर्णन केले नाही, जितके ती त्याचे गुणगान करत होती. प्रत्येक ओळीमध्ये, मला बघायची सवय असलेल्या तिचा विश्वासाने भरलेला चेहरा दिसत होता.

आणि या सगळ्याबरोबर व्याकरण आणि चिन्हांच्या भरपूर चुका होत्या.

अर्धे वर्ष जाण्यापूर्वी, मला एक खूप काही आनंद दर्शवणारे पत्र आले. त्याच्या  सुरवातीला एका तरुण, घोटून दाढी केलेल्या, मोठी टोपी घातलेल्या व खांद्यावर चौकडीचे कापड घेतलेल्या माणसाचा फोटो होता, आणि असे लिहिलेले होते की “मी प्रेमात पडले आहे.” यानंतरची पत्रेदेखील अशीच सुंदर होती. पण त्यात निदान योग्य ठिकाणी चिन्हे दिसत होती. व्याकरणाच्या चुका नाहीशा झाल्या होत्या. त्याना पुरुषी वास येत होता. व्होल्गामध्ये कुठेतरी आपण एक थिएटर बांधले, तर किती चांगले होईल, असे कात्या आता पत्रात लिहू लागली. एक कंपनी म्हणून ते नक्कीच श्रीमंत व्यापाऱ्यांचे व जहाजमालकांचे लक्ष वेधून घेईल. त्यातून खूप पैसा मिळेल. नट तेथे सहकारी तत्वावर काम करतील --- खरेच सर्व काही खूप चांगले होईल. पण मला वाटत होते, अशा कल्पना फक्त पुरुष माणसाच्या डोक्यातूनच निघू शकतात.

ते काही असेल, पण एक दोन वर्षे सर्व काही ठीक चालले होते. कात्या प्रेमात होती. तिच्या कामावर तिचा विश्वास होता. ती आनंदी होती. पण नंतर तिची पत्रे कमी होऊ लागली. तिच्या मित्रांविषयी तक्रारीचा सूर पत्रातून उमटू लागला --- ते पहिले

सर्वात वाईट काही घडण्याचे लक्षण दिसू लागले. जर एखादा तरुण बुद्धिमान माणूस उघडपणे, इतर तशाच मंडळींबद्दल वा लेखकांबद्दल तक्रारीचा कटू सूर लावू लागला, तर त्याचा अर्थ तो बाजूला फेकला गेला असून, तो त्या कामासाठी लायक नाही.

कात्याने मला लिहिले, की तिचे मित्र नाटकाच्या सरावासाठी येत नाहीत, त्यांचे संभाषण पाठ करत नाहीत, फारच चक्रमसारखी नाटके काढतात. रंगमंचावर त्यांची वागणूक बरोबर नाही. ते प्रेक्षकांचा आदर ठेवत नाहीत व त्यांना फसवतात. तिकीटांच्या गल्ल्यात त्याना फक्त रुची असते. त्याबद्दलच ते बोलतात नाटकी नट्या फक्त लहानसहान गाणी गाऊन, स्वतःची किंमत कमी करून घेतात. दुःखी भूमिका करणारे नट, भानगडबाज बायकोच्या बिचाऱ्या नवऱ्याची आणि अविश्वासू बायकांच्या गरोदरपणाची बेकार गाणी गातात. असेच सर्व काही चालू असते. सहसा याचे नवल वाटते, की अजून असली गावढळ नाटके करणारी थिएटर्स कशी काय चालू राहिली व राहिली असल्यास अगदी क्षीण घाग्यावर, तगून राहिली आहेत.

मी उत्तर म्हणून तिला मोठे पत्र पाठवतो. ते फार कंटाळवाणे असल्याचे, मी मान्य करतो. इतर गोष्टींबद्दल मी तिला लिहितो. सर्वात उमद्या अशा जुन्या नटांशी संवाद साधायचा प्रसंग सहसा

माझ्यावर येत नाही. त्यांच्या बोलण्यावरून मला समजते, की त्यांच्या मनात असते तशीच नाटके करायचे स्वातंत्र्य त्याना मिळते असे नाही. तर समाजातील स्पंदने, चालू पद्धती व घडामोडी दर्शवणारी नवीन नाटके येत रहातात व त्यात त्यांना काम करावे लागते. त्यातील उत्तम अशा काही दुःखांतिका, अद्भुतरम्य नृत्यनाट्ये, परीकथा व विनोदी नाटके यात, त्यांच्या आयुष्यात त्यांना काम करण्याची संधी मिळते. तरी नेहमी सरळसोट मार्गाने गेलेलेच त्यांना परवडते. त्यामुळे तुमच्या लक्षात येईल, की खालावलेल्या दर्जाचे खापर नटांवर फोडता येणार नाही, तर ते खोलवर असे त्या कलेतच दडलेले आहे. समाज त्याकडे कसे बघतो, ते देखील महत्वाचे ठरते. या पत्राने कात्या चिडली. तिने मला उत्तर लिहिले, “आपण दोघे वेगळ्या नृत्यनाट्याबद्दल बोलतो आहोत. मी तुम्हाला ज्यांच्याबद्दल सहानुभूती वाटते, अशा सर्वात उमद्या लोकांबद्दल लिहिले नव्हते. तर लोकांना फसवून, लुबाडणाऱ्या लोकांबद्दल लिहिले होते. त्याना उमदेपणाशी काही देणेघेणे नसते. ते म्हणजे जंगली पशूंचा कळप असतो. त्याना दुसरीकडे कुठे कसलेही काम मिळत नाही, म्हणून ते अभिनयाकडे वळतात. त्यांचे वागणे उद्दाम व अनादरयुक्त असते. त्यांच्यात काही जन्मजात वा मिळवलेले गुण नसतात. ते दारुडे, दुसऱ्याचे वाईट करायला टपलेले, अफवा

पसरवणारे असतात. माझे ज्यावर प्रेम आहे अशी कला, अशा दुष्ट लोकांच्या हातात पडली आहे. हे किती वाईट आहे, की चांगले लोक काही अंतरावरून फक्त काही नकोसे असे वाईट, पापी काही पहातात. अजून जवळ येऊन आणि मध्ये नाक खुपसण्याऐवजी जड हातांनी अजिबात गरज नसलेले असे काही, तात्विक उद्दाम घोषणांच्या स्वरूपात लिहितात --- " आणि असेच, सर्व काही फुकट शिव्या देणारे!

अजून काही वेळ जातो आणि मला हे पत्र मिळतेः "मला वाईट रीत्या फसवले गेले आहे. मी आता जगू शकत नाही. माझ्या पैशांचे तुम्ही योग्य वाटेल, ते करा. मी तुमच्यावर वडिलांप्रमाणे व मित्राप्रमाणे प्रेम केले. मला क्षमा करा."

असे समजले की तिचा 'तो' ही जंगली पशूंच्या कळपातीलच होता. नंतर काही गोष्टींवरून मी ताडले, की आत्महत्येचा प्रयत्न झाला होता. तिने विष घ्यायचा प्रयत्न केला. असे वाटते की नंतर, ती गंभीर रीत्या आजारी असली पाहिजे. कारण नंतरचे पत्र मला याल्टाहून मिळाले. तिथे तिला बहुधा डॉक्टरांनी पाठवले असावे. तिने शेवटच्या पत्रात मला लवकरात लवकर एक हजार रुबल्स याल्टाला पाठवण्याची विनंती केली होती. त्याचा शेवट असा होताः अशा पुसट पत्राबद्दल मला माफ

करा. काल मी माझ्या बाळाला पुरले. असे एक वर्ष क्रीमियाला घालवून ती घरी परतली.

चार वर्षे ती घरापासून लांब होती आणि त्याबद्दल मला कबूल केले पाहिजे, की त्यात तिच्या बाबतीत, मी विचित्र, विश्वास बसणार नाही अशी भूमिका निभावली.

जेव्हा तिने मला सांगितले, की ती नटी होणार आहे व नंतर तिने प्रेमात पडल्याबद्दल लिहिले, तेव्हा तिच्यावर नको ते काही करण्याचे भूत स्वार झालेले होते. तेव्हा तिने मागितल्यावरून मी तिला एकदा एक हजार व परत दुसऱ्यांदा दोन हजार रुबल्स पाठवले होते. जेव्हा तिने मला तिच्या मरणाचा विचार असल्याबद्दल व बाळाला पुरल्याबद्दल लिहिले होते, तेव्हा प्रत्येक वेळी मी खचत होतो. तिच्या नशीबाबद्दल माझे जे काही लागते होते, ते फक्त माझ्या खूप विचार करण्यात व तिला कंटाळवाणी पत्र लिहिण्यातच मी दाखवले. ती पत्रे सुद्धा मी कदाचित लिहिलीही नसती. आणि तरीही मी तिच्या खऱ्या बापाची जागा घेतली होती व तिच्यावर मुलीसारखे प्रेम करत होतो.

आता ती माझ्यापासून अर्ध्या मैलावर रहाते. तिने पाच खोल्यांची एक सदनिका भाड्याने घेतली आहे व ती तिच्या

आवडीप्रमाणे सजवली आहे. जर कुणी तिच्या घर सजवण्याचे वर्णन करायचे म्हटले, तर मुख्यत्वे आळसाचे चित्र उभे राहील. आळशी शरीरासाठी मऊ कोच व आसने, आळशी पावलांसाठी मंद, फिक्या रंगाचा गालीचा, आळशी डोळयांसाठी सर्व काही फिक्या रंगाचे! आळशी आत्म्यासाठी भिंतींवर खूप स्वस्तातले पंखे. आशय झाकून टाकणारी, रेखाटनातील मूलगामित्व गमावलेली लहान चित्रे, निरुपयोगी व बेकार वस्तूंनी भरलेली छोटी टेबले आणि मांडण्या, पडद्यांसाठीच्या आकारहीन चिंध्या --- गडद रंग, सारखेपणा आणि मोकळया जागेची भीती, फक्त अंतस्थ आळशीपणाची परीक्षा करते असे नाही, तर नैसर्गिक अभिरुचीचीदेखील पायमल्ली करते. कात्या दिवसभर सोफ्यावर लोळत पडून, पुस्तके वाचत असते. सबंध दिवसात ती एकदाच दुपारी मला भेटायला म्हणून घरातून बाहेर पडते.

मी काम करत असतो आणि कात्या जवळच सोफ्यावर शांतपणे, थंडी वाजत असल्यासारखी, शाल गुंडाळून बसलेली असते. ती लहान असतांना अशी अनेक वेळा यायची त्या सवयीमुळे म्हणा, किंवा मला ती दया येण्यासारखी वाटल्याने म्हणा, पण तिच्यामुळे माझे कामातले लक्ष विचलित होत नाही. वेळोवेळी मी तिला यांत्रिकपणे काही प्रश्न विचारत रहातो. ती

मला त्रोटक उत्तरे देत रहाते. किंवा थोडे थांबून, मी तिला उदासीनतेने, वैद्यकीय मासिक वा वर्तमानपत्र चाळतांना बघतो. मग माझ्या लक्षात येते की तिच्या चेहऱ्यावर मला माझ्याबद्दलचा पूर्वीचा विश्वास दिसत नाही. तो आता काही लागते नसल्यासारखा, सैरभैर, मख्ख व खूप वेळ गाडीची वाट बघत बसलेल्या उतारुसारखा बेदरकार असतो. अजूनही ती निष्काळजीपणे साधे पण सुंदर ड्रेस घालते. दिवसभर कोचात आणि फिरत्या खुर्चीत लोळायचे असल्याने केस उंच बांधावे लागतात. आता ती पूर्वीइतकी चौकस नाही. आता ती मला प्रश्न विचारत नाही, जसे काही आयुष्यातील प्रत्येक गोष्टीचा, तिने आधीच अनुभव घेतलेला आहे. आणि आता नवीन काही ऐकायची ती अपेक्षा करत नाही.

चार वाजता हॉलमध्ये हालचाल व्हायला सुरवात होते. हरितगृहातून काही मैत्रिणींना घेऊन, लिझा घरी आली आहे. त्या पियानो वाजवतांना ऐकू येते आहे. त्या गाणे म्हणून बघत आहेत आणि हसत आहेत. जेवायच्या खोलीत येगोर टेबल लावतो आहे व ताटल्यांचा आवाज येतो आहे.

कात्या म्हणते, ‘‘बाय् बाय्. आज मी तुमच्या कुटुंबाला भेटत नाही. त्यांनी मला माफ केले पाहिजे. आज मला वेळ नाही.’’

मी तिला पुढच्या दाराकडे जातांना पाहतो. ती माझ्याकडे खालपासून वरपर्यंत बघत रागाने म्हणते,

“तुमचे वजन कमी होते आहे. तुम्ही एखाद्या डॉक्टरकडे का जात नाही? मी जाऊन सर्जी फ्योडोरोविच याना बोलावून येते. त्याना तुम्हाला तपासू दे.”

“कात्या, तशी काही गरज नाही.”

“मला कळत नाही, तुमचे कुटुंब काही करत कसे नाही? ते सगळे तर चांगले आहेत.”

ती घाईने कोट घालते. आणि असे करतांना, तिच्या निष्काळजीपणे बांधलेल्या केसांमधून दोनतीन पिना गळून पडणे अपरिहार्य असते. ते निस्तरायला ती फारच आळशी आहे. तिला वेळ नाही. ती टोपीखालील केस कसेबसे बांधते आणि चालू पडते.

मी जेवायच्या खोलीत जातो, तेव्हा माझी बायको विचारते,

“आता कात्या तुमच्याबरोबर होती का? ती थांबून आम्हाला भेटली का नाही? हे इतके चमत्कारिक --- “

लिझा नापसंती दर्शवत म्हणते, “ममा, जर तिला तसे वागायचे असेल, तर  वागू दे. आपण काही तिच्या विनवण्या करणार नाही.”

“तसे तर तसे. तुमच्या अभ्यासिकेत तीन तास बसूनही आमची काहीच दखल न घेणे, हे वागणे चढेलपणाचे आहे. असो. तिचे तिच्याकडे!

वार्या आणि लिझा दोघीही कात्याचा द्वेष करत. मला हे समजण्यास अवघड होते. मी बाई असतो, तर कदाचित मला ते समजले असते. मी व्याख्यान देतो तेव्हा माझ्यासमोर मी रोज एकशेपन्नास तरुण लोक बघतो. दर आठवड्याला मला भेटायला शेकडो वयस्क मंडळी येतात. पण यापैकी एकालाही कात्याच्या भूतकाळाबद्दल या दोघींच्या मनातील द्वेषाचे व आकसाचे कारण कळले नसते. तथाकथित लग्नानंतरचे तिचे गरोदरपण व तिचे अनौरस मूल हे कारण असावे का? मला एकही अशी बाई माहिती नाही की जी आपण होऊन त्याबद्दलच्या भावना कुणाबरोबर बोलेल. आणि हे म्हणून नाही की स्त्रिया या पुरुषांपेक्षा गुणी वा पवित्र असतात. जर त्या दुसऱ्याचे वाईट चिंतीत नसतील, तर गुण आणि अवगुण, शुद्धता आणि अशुद्धता यात फार फरक नसतो. करुणा लाथाडणे आणि सद्सदविवेक

बुद्धी न वापरणे हा स्त्रियांचा निव्वळ मागासलेपणा आहे. असा अनुभव एखाद्या पुरुषाला आला असता, तर तो माझ्याजवळ द्वेष आणि आकस याबद्दल बोलण्यापेक्षा संस्कृती व दुर्दैवाबद्दल माझ्याशी खूप बोलला असता. समकालीन स्त्रिया या मध्ययुगीन काळातल्यासारख्या हृदयावर जास्त घाव बसणाऱ्या व रडक्या असतात.

माझ्या मते, जे स्त्रियांना पुरुषांसारखेच शिक्षण द्यावे असे म्हणतात, ते बरोबर असतात.

माझ्या बायकोला कात्याचे नटी व्हायचे वेड पसंत नव्हते. तिने आमचे ऋण मान्य न करणे, तिचा गर्विष्ठपणा, विचित्रपणा आणि एका बाईला दुसऱ्या बाईत नेहमीच सापडतात, ते तिचे सगळेच दुर्गुण!

माझ्या कुटुंबांव्यतिरिक्त माझ्या मुलीच्या दोन तीन मैत्रिणीही जेवायला होत्या. लीझाची स्तुती करणारा तिचा चमचा, अलेक्झांडर. तो सोनेरी केसांचा, तिशीच्या आतील, साधारण उंची असलेला, दणकट, रुंद खांद्याचा, लालसर कल्ले असलेला आणि त्याच्या गोबऱ्या, नितळ चेहऱ्याला खेळण्यासारखा भास देणाऱ्या मिशा असलेला तो!

त्याने छोटे जाकीट घातले होते. गडद रंगाचा कोट व चौकडीची पँट घातली होती. त्याचे बूट पिवळे असून सपाट होते. त्याचे डोळे खेकड्यासारखे होते. टाय खेकड्याच्या शेपटीसारखा होता व मला वाटत होते की त्याला खेकड्याच्या सूपसारखा वास येत होता. तो आम्हाला नेहमी बोलावत असे. पण माझ्या कुटुंबातील कोणालाच त्याचे कुलशील माहिती नव्हते. तो कुठे शिकला व तो काय करतो. तो गात, वाजवत नव्हता, पण संगीत आणि गाण्याशी संबंधित होता. कुणाचे तरी मोठमोठे पियानो कुठेतरी विकत होता. तो नेहमी हरितगृहात असे. मोठ्या प्रसिद्ध लोकांशी त्याच्या ओळखी होत्या. मैफिलींमध्ये त्याचा काही सहभाग असे. तो तेथे सराईतासारखे निवेदन करे. आणि माझ्या लक्षात आले होते, की सर्वजण त्याचे मनापासून ऐकतात.

श्रीमंत व्यक्तींभोवती नेहमी त्याच्या चमच्यांचा गराडा पडलेला असतो. त्यात शास्त्र आणि कला शाखेतील लोकही असतात. अलेक्झांडरसारखा परका माणूस, असल्या लोकांच्या कोंडाळ्यात असतो. मी काही संगीतकार नाही. मी या जवळ जवळ अनोळखी अलेक्झांडरला वेगळाच कोणी समजलो असेन. पण ज्या डौलाने तो पियानोशेजारी उभा रहातो, त्याचा अधिकार

दाखवतो व कुणी गाताना, वाजवतांना ऐकतो, त्यामुळे मला संशय येतो.

तुम्ही सभ्य असाल. शंभरपेक्षा जास्त वेळा तुम्ही गुप्त सल्लागार असाल. पण जर तुम्हाला मुलगी असेल, तर तुमच्या घरी डेटिंगच्या नावाखाली चालणाऱ्या मध्यमवर्गाच्या मूल्यांना पायदळी तुडवणाऱ्या दर्जाहीन गोष्टी, येणारी तरूण माणसे  व ठरणारी वा न ठरणारी लग्ने तुम्हाला सहन करावीच लागतात. उदाहरणार्थ, जेव्हा अलेक्झांडर आमच्याबरोबर बसतो, तेव्हा माझ्या बायकोच्या चेहऱ्यावर येणारे प्रतिष्ठीत भाव मी समजू शकत नाही. तसेच केवळ त्याच्यासाठी काढल्या जाणाऱ्या वाईन व शेरीच्या बाटल्यांचे प्रकरणही मला समजत नाही. केवळ त्याला आमच्या घराच्या जीवनपद्धतीतील चैनीचे आणि उदारतेचे दर्शन व्हावे म्हणून खटाटोप असतो. हरितगृहात शिकलेले लीझाचे कुणी मित्र किंवा सभ्य पुरुषमाणसे आमच्याकडे पाहुणी म्हणून येतात, तेव्हाचे तिचे डोळे मिचमिचे करून धक्का बसल्यासारखे हसणे माझ्या सहनशक्तीपलीकडील असते. माझ्या सवयी, माझे शिक्षण किंवा माझ्या एकंदर आयुष्याच्या वळणापासून भिन्न व एकंदरीत मला आवडणाऱ्या माणसांपेक्षा वेगळी अशी कुणी माणसे रोज माझ्याबरोबर जेवायला का असतात, हे सर्वात कमाल

म्हणजे मला कळत नाही. माझी बायको आणि नोकर गूढपणे कुजबुजतात, की तो ‘प्रियकर’ आहे. पण तरीही मला त्याचे तेथील आस्तित्व का आहे, हे समजत नाही. एखाद्या झुलुने माझ्याशेजारी जेवायच्या टेबलावर बसावे, इतका मी गोंधळून जातो. माझ्या ज्या मुलीला मी लहान मूल समजतो, त्या माझ्या मुलीने अशा टायवर, अशा डोळ्यांवर, अशा मऊ गालांवर प्रेम करावे म्हणजे ---

आधी मला जेवण आवडायचे किंवा माझे त्याकडे लक्ष नसायचे. पण आताशा मला ते चक्क कंटाळवाणे व राग आणणारे वाटते. आता मला बढती मिळून मी माझ्या कार्यालयात डीन झालो असलो, तरी काही कारणाने माझ्या कुटुंबासाठी जेवणातील पदार्थ व जेवायच्या पद्धती बदलायची गरज निर्माण झाली आहे. साध्या जेवणापेक्षा, मी एखाद्या विद्यार्थ्यासारख्या व डॉक्टरसारख्या सवयी असलेला झालो आहे. फळे किंवा भाज्यांचे कसले तरी सूप व त्यात तरंगत असलेले काही तुकडे, असे हल्ली असते. माझ्या बढतीमुळे मी साध्या कोबीच्या सुपाला, शुद्ध ब्रीम माशाला, बदकाच्या मासाला, सफरचंदांना व गोडसर केकला मुकलो आहे. बडबडी, सतत हसणारी, म्हातारी स्वयंपाकीण आगाशादेखील सध्या नाही. तिच्याऐवजी हल्ली

मुका, उद्दाम व उजव्या हातात पांढरा मोजा घातलेला, येगोर जेवण वाढतो. मधली सुट्टी कमी वेळाची असते. पण ती मला खूप मोठी वाटते. कारण त्यात करण्यासारखे काहीच नसते. त्यात पहिला रुबाब राहिलेला नाही. मनमोकळे संवाद, विनोद, ह्सणे, हे सगळे इतिहासजमा झाले आहे. जेवणाच्या खोलीत मी माझी बायको व मुले जमत असू, तेव्हा माझ्यासारख्या व्यग्र माणसाला तो वेळ त्यांना भेटायचा व विश्रांतीचा वाटे. अर्धा तास मी विद्यार्थी, माझे काम सोडून फक्त त्यांचा आहे हे जाणून, त्यांच्यासाठी तर तो एखाद्या सणासारखा असे --- तो वेळ खरेच, आनंदी व झगमगीत असे. आता एका पेल्यात दारू चढणे नाही, आगाशा नाही, शुद्ध ब्रीम मासा नाही, जेवणाच्या वेळेची टेबलाखाली कुत्र्या मांजरांमध्ये चालतात, तशी छोटीमोठी भांडणे नाहीत किंवा कात्याच्या गालावरील चिकटपट्टी सूपात पडणे नाही.

हल्लीची आमची जेवणे म्हणजे भूक नसताना खाणे आहे. माझ्या बायकोच्या चेहऱ्यावर तिच्या नेहमीच्या काळजीचे व गंभीर जड भाव असतात. ती अस्वस्थपणे आमच्या ताटांकडे बघून म्हणते, “मला सांग तुला हे भाजलेले काही आवडत नाही का? --- खरेच सांग” आणि मला उत्तर द्यावे लागे, “प्रिये, तू

काळजी करू नकोस. भाजलेले नेहमीच छान असते.” ती म्हणते, “तू मला नेहमीच सांभाळून घेतोस. कधीच मला खरे सांगत नाहीस. मग अलेक्झांडरने एवढे कमी का खाल्ले?” जेवणभर फुकटच ते चालू रहाते. लीझाचे डोळे मिचमिचे करून धक्का बसल्यासारखे हसणे चालू असते. मी त्या दोघींकडे बघतांना मला हे आता पूर्णपणे समजते, की फार पूर्वीपासून, त्यांच्या मनात काय चालले आहे, हे मला समजणे बंद झालेले आहे. मला वाटते, कोणे एके काळी त्या घरात खऱ्या कुटुंबांसारख्या रहायच्या. पण आता मी ज्यांच्याबरोबर जेवतो, त्या माझी खरी बायको व लिझा नाहीच आहेत. त्यांच्यामध्ये अचानक काही बदल झाला आहे. हा बदल घडून आलेला दीर्घ काळ मला माहीतच नाही. मग मला काही समजत नाही, यात काही आश्चर्य नाही. असा बदल का झाला? मला माहिती नाही. कदाचित देवाने मला त्यांच्यापेक्षा जास्त शक्ती दिली असेल. लहानपणापासून बाहेरील परिस्थितीला तोंड द्यायची मला सवय आहे. त्यामुळे मी निगरगट्ट झालो आहे. प्रसिद्ध होण्यापूर्वीचे टक्केटोणपे, उच्चपदावर विराजमान होणे, थोरामोठ्यांशी झालेल्या ओळखी आणि असेच अजून बरेच काही यामुळे मी फार बदललो नाही. मी सावध आणि सुरक्षित राहिलो. पण माझ्या दुबळ्या बायको व मुलीवर ते मोठ्या बर्फवर्षावासारखे आदळले व त्या चिरडल्या गेल्या.

तरुण स्त्रिया आणि अलेक्झांडर नेहमी बाख वगैरे गायक आणि पियानोवादकांबद्दल बोलत असतात आणि माझ्या बायकोला त्यातील काही माहिती नसल्याने, ती त्यांच्याकडे बघून नुसती हसते आणि पुटपुटते, "छान! --- खरे की काय? --- काय म्हणता आहात! " अलेक्झांडर शांतपणे खातो, विनोद करतो आणि त्या दोघीचे बोलणे कमी प्रतीचे असल्यासारखे निरीक्षण करतो. दर थोड्या वेळाने, त्याला वाईट फ्रेंचमध्ये बोलायची लहर येते. काही कारणाने त्याला हे गरजेचे वाटू लागते, की मला माझ्या चांगल्या तब्येतीसाठी शुभेच्छा द्याव्यात.

मला राग येतो. अर्थात मी त्यांच्याशी व तेही माझ्याशी मोकळेपणे वागू शकत नाहीत. एकमेकांच्या विरुद्ध गटात असणे, हे मला जवळून माहिती होते. पण आता माझ्या बाबतीतच ते होऊन, माझा छळ होऊ लागला. मला अलेक्झांडरमधले दोषच पटापट दिसू लागले. भावी जावई म्हणून त्याच्याकडे बघण्याऐवजी, मी त्याला माझ्या पसंतीचा तो नाही, असे समजू लागलो. अजूनही काही बाबतीत, त्याचे आस्तित्व मला खुपू लागले. सहसा मी जेव्हा एकटाच असतो, किंवा मला आवडणाऱ्या लोकांमध्ये असतो, तेव्हा मला माझे गुण कधी दिसत नाहीत. मी जणू मला कालच शास्त्रज्ञ झाल्यासारखे, ते मला

फारसे महत्वाचे वाटत नाहीत. पण अलेक्झांडरसारख्या माणसाबरोबर असतो, तेव्हा माझे गुण मला त्याच्या तुलनेत शिखर ढगात पोचलेल्या डोंगराएवढे मोठे वाटतात. आणि तो डोळ्यांना जेमतेम दिसेल, असा कुठे तरी तळाशी असतो.

जेवणानंतर मी अभ्यासिकेत जाऊन, दिवसातून एकदाच ओढतो, तो पाईप पेटवतो. सकाळपासून रात्रीपर्यंत मी पूर्वी तो ओढत असे. पण ती माझी सवय मी प्रयत्नपूर्वक खूपच कमी केली. मी पाईप ओढतांना माझी बायको माझ्याशी बोलायला येऊन बसली. ती सकाळसारखेच काहीतरी बोलणार, हे मला माहिती होते.

तिने सुरवात केली, “मला तुझ्याशी लीझाबद्दल काही महत्वाचे बोलायचे आहे --- तू काही लक्ष का देत नाही आहेस?”

“म्हणजे काय?”

“तू असे भासवतो आहेस, की तू त्या गावचाच नाहीस. पण हे चांगले नाही. काही लागते नसल्यासारखे वागणे, बरोबर नाही. अलेक्झांडरला लिझा आवडते आहे, यावर तुझे काय म्हणणे आहे?”

“मला वाटते, तो चांगला माणूस नाही. मी त्याला ओळखत नाही. त्यामुळे मी असे ठामपणे म्हणू शकत नाही, पण मला तो आवडत नाही. आणि हे मी तुला यापूर्वी हजार वेळा सांगितले आहे.

“पण हे अशक्य आहे --- अशक्य --- “

ती उठून रागाने फेऱ्या मारू लागते.

ती म्हणते, “आता हे प्रकरण इतक्या गंभीर वळणावर आलेले असतांना, असे म्हणणे अशक्य आहे. जेव्हा तुमच्या मुलीच्या आयुष्याच्या सुखाचा प्रश्न असतो, तेव्हा तुम्ही तुमच्या सर्व व्यक्तिगत बाबी बाजूला ठेवायला हव्यात. मला माहिती आहे, तुम्हाला तो आवडत नाही --- ठीक आहे --- पण आता जर आपण त्याला धुडकावून लावले, सर्व जमलेले मोडून टाकले, तर उरलेले आयुष्यभर लिझा आपल्याबद्दल तक्रार करत राहणार नाही, कशावरून? आताशा सुयोग्य मुले मिळतात कुठे? अजून कोणीच लीझासाठी आले नाही, तर मग काय? त्याचे लीझावर खूप प्रेम आहे आणि तिलाही तो आवडतो --- अर्थात त्याचे करीयर एवढे चांगले नाही, पण त्याला आपण काय करणार? देवाच्या मनात असले, तर यथावकाश, तो कुठेतरी स्थिरस्थावर होईल. तो चांगल्या व श्रीमंत घराण्यातील आहे.”

“तुला कसे काय माहिती?”

“तो तसे म्हणाला. कार्कोव्हजवळ त्याच्या वडिलांचे मोठे घर आहे. थोडक्यात, तुला कार्कोव्हला जावे लागेल.”

“कशासाठी?”

“तू चौकशी करू शकतोस. तेथील प्राध्यापकांबरोबर तुझ्या ओळखी आहेत. ते तुला मदत करतील. मी पण गेले असते. पण एका बाईने असे जाणे --- “

मी रागाने म्हणालो, “मी काही कार्कोव्हला जाणार नाही.”

माझी बायको चिडली. तिचा चेहरा विदारक दिसू लागला.

ती हुंदके देत बोलली, “कृपा करून --- कृपा करून, मला या ओझ्यातून मुक्त कर. मला त्रास होतो आहे.”

तिच्याकडे मला बघवत नव्हते.

मी हळूवारपणे म्हणालो, “ठीक आहे वार्या, जर तू म्हणत असशील, तर मी जातो. मी कार्कोव्हला जाऊन तुझ्या मनाप्रमाणे करतो.”

तिने डोळ्याला रुमाल लावला व रडण्यासाठी तिच्या खोलीत गेली. मी एकटा राहिलो.

थोड्या वेळाने, आत दिवा आणला जातो. मी वयस्क झाल्यापासून खुर्च्या आणि दिव्याच्या शेडने पडणाऱ्या अशा लांब सावल्यांशी परिचित आहे. आणि मी जेव्हा त्यांच्याकडे बघतो, तेव्हा आधीच रात्र झालेली आहे आणि माझे छळीक झोप न येणे आता सुरु होणार, असा विचार माझ्या मनात येतो. मी पडतो. परत उठून फेऱ्या मारतो. संध्याकाळपूर्वी, जेवल्यानंतर मी उदास होऊन, माझ्या रागाच्या टोकाला जाऊन पोचतो. मी उगीचच रडू लागतो व उशीत माझे तोंड लपवतो. कोणीतरी येण्याची मला भीती असते. मी एकदम मरण्याची भीती असते. मला माझ्या अश्रूंची लाज वाटते. माझे हृदय जड होते. मला वाटू लागते की मला हे दिव्याचे, पुस्तकांचे, जमिनीवरील सावल्यांचे दृष्य किंवा हॉलमधून येणारा आवाज सहन होणार नाही. कुठलातरी अदृष्य, समजू न शकणारी शक्ती, मला जोराने घराबाहेर ढकलते आहे. मी उडी मारतो. घाईने कोट व टोपी घालतो. आणि सावकाशीने कुटुंब जागे होणार नाही अशा तऱ्हेने बाहेर जातो. कुठे?

या प्रश्नाचे उत्तर खूप दिवस माझ्या डोक्यात बसलेले आहे. ते असे की कात्याकडे.

## तीन

नेहमीप्रमाणे, ती टर्किश दिवाणवर लोळून काही वाचते आहे. मला बघून ती आरामात, तिचे डोके उचलून बसते आणि माझ्या हातात तिचा हात देते..

मी थोडा दम खाऊन म्हणतो, "तू नेहमी लोळत असतेस. ते चांगले नाही. तुला काही उद्योग शोधून काढला पाहिजे."

"अं?"

"मी म्हणालो, तुला काही उद्योग शोधून काढला पाहिजे."

"काय? स्त्री फक्त फारसे कसब नसलेले व फार मान न मिळणारे काम करू शकते."

शांतता.

मी अर्धवट विनोदाने म्हणालो, "तू लग्न का करत नाहीस?"

"मला लग्न करायला कोणी नाही आणि ते करायचे काही कारणही नाही."

"तू अशी जगू शकणार नाहीस."

“नवऱ्याशिवाय? ते खरे आहे. सगळीकडे पुरुषमाणसे आहेत. जर कुणाला माझ्यात रुची असेल तर!”

“हे बरे नाही, कात्या.”

“काय बरे नाही?”

“तू आता म्हणालीस तेच.”

मला नाराज झालेले बघून व वाईट वाटणे टाळण्यासाठी, कात्या म्हणाली,

“इकडे या. हे बघा.”

मी नाराज आहे असे काही नाही.

ती मला एका उबदार खोलीत घेऊन जाते व लिहायच्या टेबलाकडे निर्देश करत म्हणते,

“हे बघा --- मी हे तुमच्यासाठी तयार ठेवले आहे. तुम्ही इथे काम करू शकता. रोज तुमचे काम घेऊन या व इथे बसून ते करा. घरी तुम्हाला लोक त्रास देतात. तुम्ही इथे काम कराल का? तुम्हाला ते आवडेल का?”

तिला नाही म्हणून नाराज करायला नको म्हणून, मी म्हणालो की मला हे आवडले व मी इथे येऊन काम करेन. मग आम्ही दोघे त्या उबदार खोलीत बसून, बोलू लागलो.

तेथील गरम, उबदार वातावरण आणि सहानुभूतीपूर्ण व्यक्तीचे तिथे असणे, यामुळे मी पूर्वीप्रमाणे तृप्त झालो, एवढेच नाही तर मला तक्रार करण्याची व तिच्यावर गुरगुरण्याची इच्छा उफाळून आली. काही कारणाने मला असे वाटत होते, की मी असे केले तर मला बरे वाटेल.

मी एक सुस्कारा टाकून बोललो, "प्रिय मुली, वाईट गोष्टी होत आहेत. फार वाईट --- "

"काय झाले?"

माझ्या मुली, गोष्ट अशी आहे की राजाचा सर्वात पवित्र आणि उत्तम हक्क कुठला असेल तर तो दया दाखवणे हा होय. मी स्वतःला नेहमी राजा समजतो. कारण मी याचा अमर्याद उपयोग केलेला आहे. मी डावे उजवे असा कधीच भेदभाव केला नाही. आपण होऊन प्रत्येकाला माफ केले. मी सहन केले. जेव्हा इतरांनी आरडाओरडा करून राग दाखवला, तेव्हा मी फक्त चार समजुतीच्या गोष्टी सांगून त्यांचे मन वळवण्याचा प्रयत्न केला. मी

आयुष्यभर असा प्रयत्न केला, की विद्यार्थ्यांना, मित्रांना, नोकरांना व कुटुंबाला माझ्याबरोबर रहाणे सुसह्य व्हावे. पण आता मी काही राजा नाही. माझ्या आत दिवसरात्र असे काही वाईट विचार सुरु आहेत, की जे फक्त गुलामानाच लागू होतात आणि यापूर्वी माझ्या मनात कधीच आले नव्हते. मी चिडतो व घाबरतो. मी फार कडक, सतत मागणी लावून धरणारा, चिडका, संशयी व काही आब नसलेला झालो आहे. पूर्वी मी जे विनोद म्हणून चांगल्या रीतीने घेऊन, सोडून दिले असते, तेच आता माझे हृदय जड करतात. माझी तर्कशक्ती पण बदलली आहे. पूर्वी मी पैशाला क्षुल्लक समजायचो. पण आता मी पैशाला क्षुल्लक समजत नाही, तर श्रीमंत लोकांना तसे समजतो. आधी मी आक्रमकता व दुष्टपणा या प्रवृत्तींचा द्वेष करायचो. पण आता ते दुर्गुण अंगी असणाऱ्यांचा करतो. जसे काही तेच फक्त दोषी आहेत आणि आपण एकमेकांना काही शिकवत नसल्याने, आपण पूर्णपणे निर्दोषी आहोत. याचा अर्थ काय? माझ्या खात्री वाटण्यात बदल झाल्याने, माझ्यात नवीन विचार व भावना उदयाला आल्या आहेत. पण तो बदल का झाला?

जग वाईट झाले आणि मी जास्त चांगला झालो का? की मी पूर्वी आंधळा आणि बेपर्वा होतो? माझी मानसिक व शारीरिक

शक्ती कमी झाल्याने, हा बदल झाला असेल --- तर मी आजारी आहे व माझे वजन रोज कमी होत आहे --- तर मग माझी परिस्थिती दयनीय आहे. याचा अर्थ माझे नवीन विचार विचित्र आहेत. चांगले नाहीत. मला त्यांची लाज वाटली पाहिजे.

कात्या मध्येच बोलते, "आजारपणाचा आणि याचा काही संबंध नाही. आता तुमचे डोळे उघडले आहेत, एवढेच. तुम्हाला पूर्वी काही कारणाने ते समजून घ्यायचे नव्हते. माझ्या मते तुम्ही सर्वप्रथम तुमच्या कुटुंबाला सोडले पाहिजे."

"तू काहीच्या काही बोलते आहेस."

"तुम्ही त्यांच्यावर प्रेम करत नाही, मग कशासाठी हा दुटप्पीपणा? आणि याला कुटुंब म्हणतात का? स्वतंत्र आस्तित्व नसलेले! ते आज मेले तरी उद्या त्याची कोणी दखलही घेणार नाही.

माझी बायको आणि मुलगी कात्याचा द्वेष करतात आणि तीही त्याना कःपदार्थ समजते. पहिल्या दिवशी आम्ही लोकांच्या एकमेकांना कमी समजण्याबद्दल क्वचितच बोललो असू. पण जर एखाद्याने कात्याचा दृष्टीकोन बघितला आणि असा हक्क असल्याचे मान्य केले तर एखाद्याला हे पटेल, की कात्याला

माझ्या बायको व मुलीला कमी लेखण्याचा हक्क आहे. तसाच माझ्या बायकोला व लिझालाही तिचा हेवा करायचा हक्क आहे.

ती परत म्हणते, “स्वतंत्र आस्तित्व नसलेले! तुम्ही आज जेवलात का? ते तुम्हाला जेवायला हाक मारायला विसरले का? त्याना अजून तुमचे आस्तित्व आठवते, हे कसे काय?”

मी ठामपणे बोललो, “कात्या, गप्प बस.”

“आणि मला त्यांच्याबद्दल बोलून आनंद होतो, असे तुम्हाला वाटते का? मला त्या अजिबात माहिती नसत्या, तर जास्त आनंद झाला असता. माझे ऐका, प्रिय काका, सर्व काही सोडून द्या. जितक्या लवकर परदेशी जाल, तितके बरे.”

“तू काही बोलतेस. कुठल्या विद्यापीठात?”

“कुठल्याही ठिकाणी जा. नाहीतरी त्यात विशेष काही अर्थ नसतो. तुम्ही गेली तीस वर्षे शिकवत आहात. आणि तुमचे विद्यार्थी कुठे आहेत? त्यांच्यापैकी कुणी प्रसिद्ध शास्त्रज्ञ झाले असतील का? त्यांच्याशी संपर्क साधा. त्याना मोजा. अशा डॉक्टरेट मिळवलेल्या विद्यार्थ्यांची संख्या, त्याच्या विद्यार्थ्यांमुळे कितीतरी पट झाली असेल. तुम्ही सर्वश्रेष्ठ आहात.”

मी घाबरून म्हणालो, “अरे बापरे. तुझे डोके फार चालते. तू किती हुशार आहेस! आता शांत बस. नाहीतर मी निघतो. तुझ्या धारदार अकलेला कसे उत्तर द्यावे, ते मला कळत नाही.”

नोकराणी येऊन चहासाठी बोलावते. चहा घेतांना आमच्या संभाषणाचा विषय बदलतो. बरे झाले देवा. माझ्या म्हातारपणाच्या अशक्तपणाबद्दल --- त्या सगळ्या गोष्टींबद्दल --- आधीच तक्रार केलेली असल्याने, मी निर्धास्त होतो. मी कात्याला माझ्या भूतकाळाबद्दल सांगितले. आणि आश्चर्य म्हणजे, मी तिला अशा काही गोष्टी सविस्तरपणे सांगितल्या, की त्या अजून माझ्या लक्षात आहेत असा मला कधी संशयदेखील आला नव्हता. तिने त्या अभिमानाने, श्वास रोधून व समरस होऊन ऐकल्या. मी तिला सांगितले की मी कसा चर्चच्या जागेत अभ्यास केला आणि विद्यापीठात जायची स्वप्ने बघू लागलो. मी तेथील बागेत फेऱ्या मारत असे. तेव्हा दूरवरच्या खानावळीतून गाणे आणि ॲकॉर्डीअनचे तारस्वर वाऱ्यावर आरुढ होऊन येत असत. चर्चच्या कुंपणावरून तीन घोड्यांचा टांगा घुंगरू वाजवत जोरात जाई. त्यामुळे माझी छातीच नव्हे तर --- पोट व हातपायदेखील आनंदाच्या भावनेने भरून जात. मी अकॉर्डीअन --- तारस्वरातील ॲकॉर्डीअन --- आणि कमी कमी होत जाणारा

घुंगरांचा आवाज ऐकत रहात असे. मी डॉक्टर झाल्याची कल्पना करत असे आणि एकापेक्षा एक कल्पनाचित्रे --- रंगवीत बसे. आता तू माझी ती स्वप्ने खरी झाल्याचे बघते आहेस. मी स्वप्ने पाहिली होती, त्यापेक्षा जास्त मला मिळाले आहे. गेली तीस वर्षे मी आवडता प्राध्यापक आहे. मला उत्तमोत्तम मित्र मिळाले. मी मानाची पदे भूषवली. मी प्रेम केले. भावनामयतेने लग्न केले. मला मुले झाली. थोडक्यात मागे वळून पहाता, मला माझे आयुष्य सुंदर तऱ्हेने, बुद्धिमत्तेने चमकतांना दिसते. आता त्याचा उपसंहार मला नाश होईल, असा करायचा नाही. त्यासाठी मला माणसासारखे मरण यावे. जर मरण खरोखर धोकादायक असेल, तर मला एका शिक्षकाला, शास्त्रज्ञाला व ख्रिश्चन देशातील नागरीकासारखे फायदेशीर ठरणारे मरण यावे. मी ते आनंदाने व संतुष्टतेने स्वीकारावे. पण माझा शेवट जवळ आलेला असतांना मी बुडतो आहे. मी तुझ्याकडे मदत मागायला आलो आहे. आणि तू मला म्हणते आहेस, बुड. असे कसे काय?

इथे पुढच्या हॉलमध्ये घंटी वाजते आहे. कात्या आणि मी ती ओळखतो आणि म्हणतो,

"हा नक्की मिखाईल फ्योडोरोव्हीच असला पाहिजे."

आणि खरेच क्षणभराने माझा मित्र आत येतो. तत्वज्ञ, मिखाईल फ्योडोरोव्हीच. उंच, सुदृढ, साधारण पन्नाशीचा, घोटून दाढी केलेला, दाट करड्या केसांचा आणि काळ्या भुवया असलेला. तो दयाळू मनुष्य असून उत्तम मित्र आहे. तो जुन्या उमराव कुटुंबातून आलेला आहे. फार सुदैवी आणि हुशार! शिक्षणशास्त्र आणि साहित्यात खास भूमिका केलेला! तो स्वतः हुशार, प्रतिभावान, सुसंस्कृत आहेच, पण थोडासा विचित्रही आहे. काही अंशी आपण सगळेच विचित्र असतो. पण त्याच्या विचित्रपणाने त्याला इतरांपेक्षा फारच वेगळा आणि पूर्णपणे त्रासदायक नसलेला असे म्हणता येणार नाही, पण या सर्वांमधून त्याचे गुण जाणणारे अगदी थोडेजण आहेत.

तो खोलीत येतो. सावकाश त्याचे मोजे काढतो आणि त्याच्या मखमली आवाजात म्हणतो,

“शुभ सकाळ. काय चहा चालला आहे का? ते अगदी बरोबर आहे. फारच थंडी आहे.”

मग तो टेबलाशी बसतो. पेला घेऊन लगेच बोलायला सुरवात करतो. त्याच्या बोलण्याचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे, ते विनोदी आणि खेळकर असते. त्याला तत्वज्ञानाची व शेक्सपिअरच्या साहित्याची जोड असते. तो नेहमी गंभीर

गोष्टींबद्दल बोलतो. पण गंभीरपणे कधीच बोलत नाही. त्याची मते नेहमी टोकेरी, शिवराळ पण त्याच्या मृदु, विनोदी स्वरात असतात. कसे माहिती नाही, पण त्याचे टोकेरी, शिवराळ बोलणे कानांवर अत्याचार करत नाही. आणि लवकरच तुम्हाला त्याची सवय होते. दर संध्याकाळी तो विद्यापीठातील आयुष्याचे पाच सहा किस्से सांगतो आणि सहसा तो टेबलाशी बसला, की त्यानेच सुरवात करतो.

तो त्याच्या काळ्या भुवयांची फसवी हालचाल करत, सुस्कारा टाकत म्हणतो, “अरे देवा! जगात इतके विदूषक भरले आहेत.”

कात्या विचारते, “त्याचे काय?”

“मी माझे व्याख्यान संपवून जिना उतरत असतांना मला आपला तो मूर्ख भेटतो, क्ष --- तो नेहमीप्रमाणे त्याचा घोड्यासारखा जबडा उघडा टाकून, कुणाजवळ तरी त्याच्या अर्धशिशीबद्दल तक्रार करायला चाललेला असतो. ते त्याची बायको किंवा त्याचे व्याख्यान ऐकायची इच्छा नसलेले विद्यार्थी असू शकतात. तर मला काय वाटते, की त्याने मला पाहिले आहे --- त्यामुळे आता माझी काही खैर नाही”

आणि असेच पुढे चालू रहाते. किंवा तो अशी सुरवात करतो,

“काल मी आपल्या य चे व्याख्यान ऐकायला गेलो होतो. मला याचे आश्चर्य वाटते, की तो मूर्ख आपल्या विद्यापीठातील काही गुंतागुंतीच्या नको त्या गोष्टी, लोकांना सांगण्याचे धाडस करत होता. युरोपिअन जितके मूर्ख असू शकतात, तेवढा तो आहे. नशीब की त्याच्यासारखा दिवसाउजेडी मेणबत्ती पेटवणारा, अजून दुसरा कुणी सर्व युरोपमध्ये सापडत नाही. त्याचे पाय गार पडतात. तो स्वतःच्या नोट्स काढू शकत नाही. सायकलवर बसलेल्या भिक्षुसारखे त्याचे गरीब बिचारे विचार हलत नाहीत. सर्वात कडी म्हणजे, तो काय म्हणतो आहे, ते काही केल्या लक्षात येत नाही. फाईल्स कंटाळून मरायला टेकतात. आमच्या मोठ्या सभागृहात, सर्व अभ्यासक्रम नव्याने सुरु करायचा समारंभ होतो. जेव्हा पारंपारिक भाषण केले जाते तेव्हा जो भयंकर कंटाळवाणा कार्यक्रम होतो, त्याच्याशीच याची फक्त तुलना होऊ शकते.

आणि एकदा टोकेरी बदल घडून येतो.

“सुमारे तीन वर्षांपूर्वी आपल्या निकोलायला आठवते त्याप्रमाणे, मला एक भाषण द्यायचे होते. गरम, घट्ट गणवेष

घालून, तुम्ही आधीच त्रासलेले असता. मी अर्धा तास, एक तास, दीड तास, दोन तास वाचले --- मग मी पाहिले तर देवदयेने दहा पाने उरली होती. शेवटी सार काढलेली चार पाने होती. ती मी गाळू शकलो असतो. त्यामुळे ती वगळता फक्त सहा पाने उरली असती. मग मी पुढील रांगेत काही धर्मगुरू व सजलेले काही ऑफिसर्स बसले होते. ते गरीब बिचारे खरे तर फार कंटाळले होते. झोप येऊ नये म्हणून, ते डोळे फिरवत बसले होते आणि चेहरा सजग ठेऊन इकडे तिकडे बघत होते. माझे भाषण आवडल्याचा व समजत असल्याचा अभिनय करत होते. तर मग मला वाटले, जर तुम्हाला आवडते आहे, तर मग मी अजून वाचतो. त्याना चिडवण्यासाठी मी ती चार पानेही वाचली.”

जेव्हा तो बोलतो, तेव्हा एखाद्या चिडवणाऱ्या माणसासारखे त्याचे डोळे आणि भुवया हसतात. तेव्हा त्याच्या डोळयात द्वेष किंवा तुच्छता नसते, तर मोजक्या लोकांमध्ये दिसणारा तीक्ष्णपणा व कोल्ह्याची लबाडी असते. त्याच्या डोळयांची अजून एक विशेषता मला जणवली. जेव्हा तो कात्याकडून पेला घेतो किंवा तिची काही शेरेबाजी ऐकतो किंवा ती काही कारणाने खोली सोडून जाते, तेव्हा डोळयांनी तिला निरखतो, तेव्हा त्या बघण्यात मला काही शांत, शरणार्थी व पवित्र भाव दिसतात.

नोकराणी चहाचा पसारा आवरते आणि चीजचा मोठा तुकडा, काही फळे व खरे तर फारशी चांगली न लागणारी, पण क्रिमियात असल्यापासून कात्याला आवडणारी शँपेन टेबलावर आणून ठेवते. मिखाईल पत्त्यांचे दोन संच काढतो व पेशन्स खेळायला सुरवात करतो. त्याच्या मते पेशन्सच्या एका प्रकारात, खूप हुशारी व एकाग्रता लागते. पण तरी खेळतांना तो बोलून स्वतःचे मनोरंजन करायचे थांबवत नाही. कात्या त्याच्या पत्त्यांवर लक्ष ठेऊन आहे. ती बोलण्यापेक्षा बघून, त्याला काही सुचवते. संध्याकाळभर, ती दोन पेल्यांपेक्षा जास्त वाईन पीत नाही. मी पाऊण पेला पितो. आणि बाकी बाटली मिखाईल संपवतो. तो खूप पितो आणि तरीही त्याला कधीच चढत नाही.

पेशन्सनंतर आम्ही उच्च प्रकारच्या अनेक प्रश्नांवर चर्चा करतो. आमच्याकडून आमचा सर्वात जास्त आवडता विषय --- शास्त्र हा छळला जातो.

मिखाईल म्हणतो, ‘‘शास्त्र हा विषय सतत नवीन वाटतो, त्याबद्दल देवाचे आभार! त्याचे गाणे गाईले जाते. मनुष्याला आधीच असे वाटू लागले आहे, की याची जागा आता दुसऱ्या एखाद्या विषयाने घेतली पाहिजे. तो अंधश्रद्धांमधून उगवला आहे व फोफावला आहे. आणि तो आजीसारख्यांच्या अंधश्रद्धेचे उत्तम

उदाहरण आहे. तो पिढ्यानपिढ्या टिकून आहे. सोने तयार करायचे शास्त्र, तत्वज्ञानातील स्थलकालातीत अमूर्त संकल्पना आणि कायकाय हे त्यातूनच निर्माण झाले आहे. शिकलेले युरोपियन्स आणि ज्यांच्याकडे शास्त्र विकसित झालेले नाही, असे चिनी यांच्यात फारसा फरक नाही. आणि असलाच, तर तो वरवरचा आहे. चिनी लोकाना शास्त्र माहिती नाही, पण त्यामुळे त्यांचे काय नुकसान झाले आहे?"

मी म्हणालो, "माशीला सुद्धा शास्त्र माहिती नाही. पण त्याचे एवढे काय?"

"अरे, तू चिडू नकोस. मी हे फक्त इथे आपल्याआपल्यात म्हणतो आहे --- तुला वाटते त्यापेक्षा मी जास्त सावध आहे. मी हे बाहेर लोकांसमोर बोलत नाही, देव मला तसे करून देणार नाही. लोकांमध्ये अफवा पसरतात की शेती, हस्तोद्योग  आणि व्यापारापेक्षा, शास्त्र आणि कला यांचे मूल्य जास्त उच्च आहे. आपला समाज अशा अंधश्रद्धेवर पोसला गेलेला आहे. देवकरणीने तुम्ही किंवा मी हे बदलू शकत नाही.

धीर धरल्यास, तरुण पिढीही असेच समजत रहाते.

लोक हल्ली क्षुद्र होत चालले आहेत. मी आदर्शांबद्दल बोलत नाही, पण नीट काम कसे करायचे किंवा विचार कसा करायचा, हे देखील लोकांना माहिती नाही. नव्या पिढीकडे बघून मला दुःख होते.”

कात्या सहमती दर्शवत बोलते, “हो. लोक हल्ली खरेच क्षुद्र होत चालले आहेत. मला सांगा, गेल्या पाच दहा वर्षात तुम्हाला एक तरी असाधारण रीत्या हुशार असा विद्यार्थी दिसला का?”

“मला इतर प्राध्यापकांबद्दल माहिती नाही, पण माझे तरी असे कुणी विद्यार्थी नाहीत.”

“माझ्या वेळी मी अनेक विद्यार्थी पाहिले. त्यात शास्त्रज्ञ व खूपसे नट झाले --- आणि काय? पण त्यातील एकही मला भेटावेसे वाटेल, असा हुशार किंवा बरा नट वाटला नाहीच, पण साधा माणूस म्हणूनही चांगला वाटला नाही. ते बिचारे साधे व कुठलीच हुशारी नसलेले होते. काहीच चमक नसलेले होते --- “

क्षुद्रपणाविषयीचे हे सर्व संभाषण प्रत्येक वेळी मला माझ्या मुलीविषयी काही नको ती कुजबुज कानावर पडेल की काय, असे वाटायला लावणारी असते. त्यामुळे मी उदास होतो. ते शिव्याशाप फार  लांबलचक असतात आणि खूप झिजलेल्या

पायावर उभे असतात. असे क्षुद्रपणासारखे आदर्शरहीत किंवा सुंदर भूतकाळाशी संबंधित असतात. कुठलेही शिव्याशाप, जरी ते आपण स्त्रियांबरोबर असताना कुणी दिले, तरी नेमकेपणे दिलेले पाहिजेत. नाहीतर मग ते काही शिव्याशाप नाहीत, तर सभ्य लोकांना न शोभणारे, रिकामे टीकात्मक बोलणे होईल.

मी म्हातारा मनुष्य आहे. मी गेली तीस वर्षे शिकवतो आहे. पण मला काही क्षुद्रपणा किंवा आदर्श मूल्यांचा तुटवडा दिसत नाही. मला पूर्वीपेक्षा हल्लीची परिस्थिती खूप बिघडली आहे, असेही वाटत नाही. यात खूप अनुभव असणारा माझा शिपाई निकोलाय म्हणतो, की आताचे विद्यार्थी पूर्वीसारखेच आहेत.

जर मला विचारले की आजच्या विद्यार्थ्यांमधील काय तुम्हाला आवडत नाही, तर मी पुरेसे नेमके उत्तर देईन. ते लगेच देणार नाही व देतांना खूप लांबणही लावणार नाही. मला त्यांच्यातील त्रुटी माहिती आहेत. त्यामुळे मला सामान्यपणे अंदाज करायची गरज नाही. ते सिगरेट ओढतात, दारू घेतात, उशीरा लग्न करतात, फार निष्काळजीपणा दाखवतात, विद्यार्थी सहाय्यक निधीला मदत करत नाहीत आणि लोक भुकेले राहिले, तरी त्यांची पर्वा करत नाहीत. हे मला आवडत नाही. त्याना आधुनिक भाषा माहिती नाहीत. ते चुकीचे रशियन बोलतात.

कालच माझ्या एका आरोग्यशास्त्रज्ञ मित्राला दुप्पट वेळाचे व्याख्यान द्यायला लागल्याबद्दल तो तक्रार करत होता. कारण विद्यार्थ्यांना पदार्थविज्ञानशास्त्राची व हवामानशास्त्राची काहीच माहिती नाही. त्याना हल्लीचे कोणी लेखक, चांगले लेखकही, माहिती नाहीत. एवढेच नाही तर शेक्सपिअरच्या उत्तम साहित्याचीदेखील  जाण नाही. मार्क्स ऑरेलीअस, एपिक्टेटस, किंवा पास्कल माहिती नाही. त्याना चांगले व वाईट यातील फरकदेखील कळत नाही. त्यामुळे रोजच्या जीवनातील व्यवहारात ते फसतात. सामाजिक अंगाचे छोटेमोठे प्रश्न [ उदाहरणार्थ, पुनर्वसन ] ते तुकड्या तुकड्याने सोडवतात. जरी त्याना शास्त्रीय दृष्ट्या विचार करून व प्रायोगिक पद्धतीने ते कसे सोडवायचे व ते कसे सर्वात उपयुक्त आहे, ते माहिती असले, तरी ते तसे सोडवत नाहीत. ते वयाच्या चाळीशीपर्यंत स्वेच्छेने व स्वतंत्रपणे, प्रयोगशाळा सहाय्यक, मदतनीस, शिपाई इत्यादी होण्यास तयार असतात. व्यापार किंवा कलेच्या प्रांतापेक्षा, शास्त्रामध्ये व्यक्तिगत पुढाकार घेऊन काम करयची गरज असते.

माझ्याकडे विद्यार्थी आणि हिशेबनीस होते. पण मदतनीस नव्हते. त्यामुळे त्यांच्याबद्दल माझ्या मनात कोवळीक व प्रेम

असून, मी त्यांच्याबद्दल अभिमानी नाही. आणि असेच काहीबाही.

अशा त्रुटी खूप असल्या तरी, कमजोर व घाबरट माणसाच्या मनात त्या निराशावादी व वाईट भाव निर्माण करतात. त्या सर्वांचे चारित्र्य अपघाती व अल्पायुषी असते. ते आयुष्यातील टक्केटोणपे खात जगत असतात. दहा वर्षांचा काळ त्यांच्यासाठी एक काम गुंडाळून किंवा एक जागा सोडून, नवीन वेगळ्या प्रकारच्या अडचणींचा सामना करायचा प्रयत्न करण्याचा असतो, जे खरे पाहता अशक्य असते. पण ते करण्याशिवाय त्याना काही इलाज नसतो. त्यामुळे ते अधिक कमजोर व घाबरट बनू लागतात.

मी माझ्या विद्यार्थ्यांच्या गैरवर्तणुकीने दुःखी व निराश होतो. पण मी जेव्हा गेल्या तीस वर्षात माझ्या विद्यार्थ्यांशी बोललो, शिकवले, त्यांचे आपापसातील संबंध अभ्यासून, त्याची तुलना इतर गटातील लोकांशी केली, तेव्हा मी अनुभवलेल्या आनंदाला तोड नाही.

मिखाईल बोलतो, कात्या ऐकते आणि त्या दोघा शेजाऱ्यांना त्यांच्या निरर्थक बोलण्यातील करमणूक लक्षात येत नाही. त्यांचे साधे संभाषण हळूहळू उद्धट आणि फसव्या मार्गाकडे जात रहाते

आणि दोघेही चुकीच्या व बोचरेपणाकडे झुकलेल्या पद्धतीकडे घसरू लागतात.

मिखाईल म्हणतो, “काही नमुने फारच विनोदी असतात. काल मी तुमच्या येगोरकडे आलो आणि मला वाटते, एका तिसऱ्या वर्षातील, डोब्रोलायबोव्ह कवीसारख्या चेहऱ्याच्या, ज्ञानाची खोली असलेल्या अभ्यासू वैद्यकीय शाखेच्या विद्यार्थ्याला तिथे पाहिले. आम्ही बोलू लागलो. मी म्हणालो, “तर तरुण माणसा, मी असे वाचले की काही जर्मन --- त्याचे नाव मी विसरलो --- त्याला मनुष्याच्या मेंदूमध्ये एक इडीयोटाइन नावाचे नवीन रसायन सापडले आहे. त्याबद्दल तुला काय वाटते? त्याने माझ्यावर विश्वास ठेवला आणि मला मानही दिला. मग दुसऱ्या दिवशी मी थिएटरमध्ये जाऊन बसलो. माझ्या पुढील रांगेत, मला वाटते कायद्याचा अभ्यास करणारा एक विद्यार्थी आणि तो कालचा तिसऱ्या वर्षातील विद्यार्थी बसले होते. तो तिसऱ्या वर्षातील विद्यार्थी वाट्टेल तसा पीत होता. त्याचे नाटकाकडे काही लक्ष नव्हते. तो डुलक्या काढतांना त्याची मान पडत होती. परंतु एखादा नट जोरात स्वगत म्हणू लागला, किंवा त्याने नुसता आवाज वाढवला, की तो विद्यार्थी शेजाऱ्याला कोपर ढोसून विचारी, “तो काय म्हणतो आहे? काही उ --- दा --- त्त?”

दुसरा उत्तर देई, “काही उदात्त” मग पहिला म्हणे, “वा! वा!” तो फक्त दारू प्यायला इथे आलेला असल्याचे वाटते. कलेसाठी नव्हे. काही उदात्त भावनेने!

कात्या ते ऐकून हसते. तिचे हसणे थोडे विचित्र वाटते. ती जणू भात्याची पेटी वाजवत असल्यासारखी,  श्वास आणि उच्छवास जोरजोरात घेते आणि बाहेर टाकते. तिच्या पूर्ण चेहऱ्यातील नाकपुड्या हसत असतात. मी काही सांगायला बघतो. पण काय बोलावे, ते मला समजत नाही. मी माझ्या जागेवरून उडी मारून ओरडतो,

“शांत रहा. शेवटी तुम्ही दोघे बेडकांसारखे इथे बसून, तुमच्या श्वासांनी हवा दूषित करत आहात. हे बास झाले.”

आणि त्यांचा तो प्रकार संपायची वाट न बघता, मी घरी जाण्यासाठी उठतो. बराच वेळ झाला. दहा वाजून गेले.

मिखाईल म्हणतो, “मी अजून काही वेळ बसतो. मी बसू शकतो का, कात्या?”

ती उत्तरते, “चालेल.”

“असे असेल तर मग, अजून एक बाटली आणायला सांग.”

ते दोघे मेणबत्त्यांसकट पुढच्या दारात माझा निरोप घेतात. मी माझा कोट घालेपर्यंत, मिखाईल म्हणतो,

“तुम्ही अलीकडे फार म्हातारे आणि बारीक झाला आहात. काय झाले आहे? तुम्ही आजारी आहात का?”

“हो. मो थोडा आजारी आहे.”

कात्या गुळमुळीतपणे म्हणते, आणि ते काही उपचार घेणार नाहीत.”

“अरे माझ्या प्रिय माणसा, तू काहीतरी कर. जे स्वतःची मदत करतात, त्याना देव मदत करतो. तुझ्या कुटुंबाला माझा नमस्कार सांग. त्याना न भेटल्याबद्दल मी त्यांची माफी मागतो. मी परदेशी जाण्यापूर्वी, एकदा पुढच्या आठवड्यात नक्की येऊन त्यांचा निरोप घेईन.

मी कात्याच्या चिडक्या, माझ्या आजारपणाबद्दलच्या बोलण्याने घाबरलेल्या, चेहऱ्यापासून लांब जाऊन स्वतःवरच नाराज झालो. मी स्वतःला विचारले, की मी माझ्या कुठल्या डॉक्टर मित्राचा सल्ला घ्यायला हवा का? मी अशी कल्पना करू लागलो, की तो डॉक्टर मित्र मला तपासल्यावर, शांतपणे खिडकीशी जातो. विचार करतो. मग माझ्याकडे वळून मला

त्याचा चेहऱ्यावरील सत्य वाचता येणार नाही, अशा तऱ्हेने बेदरकार स्वरात म्हणतो. “अजून तरी मला खास असे काही दिसत नाही. पण तरीही मित्रा, मी तुला काम थांबवायचा सल्ला देईन” आणि माझी शेवटची आशा संपेल.

आशा कुणाला नसते? आता स्वतःचे स्वतः परीक्षण करून उपाय सुरु केल्यावर, काही क्षणी मला आशा वाटते. माझ्या अज्ञानामुळे माझी फसवणूक होते आहे. माझ्यातील प्रथिने आणि साखरेच्या प्रमाणाने मला चकवले आहे. आता सकाळी मला दोनदा माझ्या हृदयाला सूज आल्यासारखे वाटते आहे. मी माझ्या तब्येतीबद्दल अती जागरुक असल्याने, उपचारांचे पुस्तक पुन्हा पुन्हा वाचतो आहे. रोज औषधे बदलतो आहे. मला दिलासा देणारे औषध सापडेल, असा विचार मी करतो. पण हे सर्व क्षुद्र वाटते. आकाश ढगांनी व्यापलेले असो किंवा चंद्र चांदण्या चमकत असोत, मी घरी परतलो की मला वाटत रहाते, मी लवकरच मरणार आहे. एखाद्याला वाटेल, की अशा वेळी माझे विचार आकाशासारखे अथांग, तेजस्वी व धक्कादायक --- असावेत, पण नाही. मी, माझी बायको, लिझा, अलेकझांडर, माझे विद्यार्थी व सामान्य लोक यांच्यासंबंधी विचार करतो. माझे विचार वाईट, क्षुद्र आहेत. मी मला फसवतो आहे. या क्षणी माझे

जगाबद्दलचे विचार अर्कचिव्हने त्याच्या खासगी पत्रात म्ह्टल्याप्रमाणे आहेतः 'जगात चांगल्याबरोबर वाईट असतेच. आणि नेहमी चांगल्यापेक्षा वाईटच जास्त असते. म्हणजेच प्रत्येक गोष्ट घाण आहे, इथे राहून जगावे, असे काही नाही.' मी बासष्ट वर्षे जगलो, ते फुकटच म्हणावे लागेल. हे सर्व तात्पुरते, अपघाती स्वरूपाचे, माझ्यात नीट न रुजलेले, कोंबले गेलेले असावे, असा विचार करून मी स्वतःचे समाधान करून घेतो. मी विचार करतो, 'असे असेल तर तर मग रोज तुला त्या दोन बेडकांकडे खेचते, ते काय असते?'

जरी मला माहिती होते की मी कात्याकडे उद्या परत जाणार, तरी मी माझ्याशी शपथ घेतो, मी आता तिच्याकडे जाणार नाही. माझ्या घराची घंटी वाजवून, जिन्याने वर जातांना, मला असे वाटते, की मला आता माझे कुटुंब नाही आहे व असले तरी त्याकडे परत यायची इच्छा नाही आहे. अर्थात अर्कचिव्हचे विचार माझ्यात अचानक वा तात्पुरते वसलेले असले, तरी ते माझ्यावर अधिराज्य गाजवत आहेत. आजारपणाच्या जाणीवेने, मला उदास केले असले, आळशी बनवले असले, मी जेमतेम हातपाय हलवत असलो, हजार पौंडाचे ओझे मला दिले आहे

असे मला वाटत असले, तरी मी अंथरुणात पडून रहातो व मला झोप लागते.

आणि मग --- झोप न येणे ---

# चार

उन्हाळा येतो आणि आयुष्य बदलते.

एका छान सकाळी लिझा माझ्या खोलीत येते आणि चेष्टेच्या सुरात म्हणते, “महाशय, चला, आपण जाऊया. सर्व काही तयार आहे.”

महाशयांना बाहेर नेऊन गाडीत बसवले जाते. आणि कुठे तरी नेले जाते. मला दुसरे त्याहून चांगले असे करायला काही नसल्याने, मी जात रहातो. मी उजवीकडून डावीकडे पाट्या वाचत रहातो. pohouse लहानसे दुकान, तेच उलटे वाचले की, esuohop संरचना, प्राचीन इजिप्शियन राजा फारोहला लागू पडणारा शब्द! मी स्मशानावरून जातो. जरी मी थोड्याच दिवसात स्मशानात जाऊन पडणार असलो, तरी मी त्यावरून जाताना, त्याचा माझ्यावर काही परिणाम होत नाही. मग मी जंगलातून व दुसऱ्या शेतांमधून जात रहातो. फार छान असे काही नाही. दोन तासांनी महाशयांना एका इमारतीच्या तळमजल्यावर नेले जाते. भिंतीना निळा कागद लावलेल्या एका लहानशा आनंदी खोलीत बसवले जाते.

रात्री नेहमीप्रमाणे झोप न येणे चालू रहाते. पण सकाळी जागा होऊन मी माझ्या बायकोचे बोलणे ऐकत नसतो, तर मी झोपलेला असतो. मी डोळ्यांवर झापड असलेला असा, अर्धवट गुंगीत असतो. तुम्ही झोपलेले नसलात, तरी तुम्हाला स्वप्ने पडत असतात. दुपारी मी उठलो आणि सवयीने टेबलाशी बसलो. पण अलीकडे मी काम करत नाही. कात्या मला पाठवते, ती पिवळ्या वेष्टनातील फ्रेंच पुस्तके वाचून मी माझे मनोरंजन करतो. अर्थात मी रशियन लेखकांची पुस्तके वाचणे, जास्त देशभक्तीचे ठरले असते. पण मी कबूल करतो की दोन तीन जुने लेखक सोडले, तर मला ती फारशी आवडत नाहीत. रशियन आधुनिक साहित्य मला साहित्य वाटतच नाही. मला ती एखादी हस्तकला वाटते. जरी ती आवडत नसली, तरी ती जगावी, म्हणून त्याला उत्तेजन देणे भाग असते. सर्वात उत्तम हस्तकला देखील उल्लेखनीय असू शकत नाही आणि ‘पण’ म्हटल्याशिवाय तिची स्तुती करता येत नाही. गेल्या दहा पंधरा वर्षात मी वाचलेल्या साहित्याच्या सर्व प्रकारांबद्दल तेच म्हणावे लागेल. ठळकपणे चांगले असे काहीच नाही आणि ‘पण’ म्हटल्याशिवाय त्याची स्तुती करता येत नाही. बुद्धिमान, उमदे पण विशेष प्रकारची बुद्धीमत्ता नसलेले; विशेष प्रकारची बुद्धीमत्ता असलेले उमदे पण बुद्धिमान नसलेले आणि

शेवटी विशेष प्रकारची बुद्धीमत्ता असलेले, बुद्धिमान पण उमदे नसलेले, असेच सर्व काही!

मी असे म्हणत नाही आहे, की फ्रेंच पुस्तके बुद्धिमान, उमदी व विशेष प्रकारची बुद्धीमत्ता असलेली आहेत. ती देखील माझे समाधान करू शकत नाहीत. पण ती रशियन पुस्तकांपेक्षा कमी कंटाळवाणी आहेत. रशियन लेखकांमध्ये नसलेली व्यक्तिगत स्वातंत्र्याची कल्पना व क्वचितच आढळणारा प्रतिभेचा स्पर्श, निदान त्यात दिसून येतो. मला असे एकही नवे पुस्तक आढळत नाही, ज्यात पहिल्या पानापासून लेखक त्याचे उत्तम असे काही देत नाही आणि जुने ठोकताळे सोडून, स्वतःची सद्सदविवेकबुद्धी वापरतो. नग्न शरीराबद्दल बोलायला प्रत्येकजण घाबरतो. एखादा मनोविश्लेषण करायला चाचरतो. तिसऱ्याला मानवतेबद्दल आपलासा दृष्टीकोन असतो. चौथा निसर्गवर्णनाचा भोक्ता असतो. तर अजून एखादा विरोधात जाऊन काही लिहिणारा असतो --- एखादा त्याच्या कामात मध्यमवर्गीय दृष्टीकोन बाळगणारा असतो. एखादा उमराव असतो. इत्यादी. कसबी, काळजी घेणारा, स्वतःच्या मनाने चालणारा, पण स्वतःच्या मनाप्रमाणे लिहायचे स्वातंत्र्य न घेणारा आणि त्यामुळे प्रतिभावान नसलेला, असाही असू शकतो.

हे सर्व टीकात्मक परीक्षण असेल.

गंभीर रशियन लिखाणाबद्दल, उदाहरणार्थ, समाजशास्त्र, कला, इत्यादी मी भित्रेपणाने त्याच्या वाचनाकडे वळत नाही. माझ्या लहानपणापासून तारुण्यापर्यंत मी काही कारणाने दारावर येणाऱ्या विक्रेत्यांना व थिएटर मधील डोअरकीपरला घाबरत असे. आणि माझ्यात, ती भीती अजूनही आहे. असे म्हटले जाते, की आपल्याला जे समजत नाही, त्याची आपल्याला भीती वाटते. आणि खरेच विक्रेते व थिएटर मधील डोअरकीपर इतके महत्वाचे, उद्धट, आणि नम्रतेचा लवलेशही नसलेले असतात. मी गंभीर लेख वाचतो, तेव्हा मला अशीच फुकटची भीती वाटते. अवास्तव महत्व, पोपसारख्या गंभीर आवाजात खिल्ली उडवणे, परदेशी लेखकांना घरच्यासारखी वागणूक देणे, तडफदारपणे पोकळ बाब कायदेशीर भासवण्याची खुबी --- मला हे सर्व अगम्य व घाबरवणारे वाटते. डॉक्टर व शास्त्रज्ञ जे लिहितात, ते सभ्यपणे, नम्रपणे व शांत आवाजात वाचायची मला सवय आहे. गंभीर रशियन लोकांचे लेखच नव्हे तर भाषांतरीत केलेले साहित्य वाचणेही, माझ्यासाठी त्रासदायक असते. प्रस्तावनेचा गर्विष्ठ सूर व भाषांतरकारांचे भरपूर लिखाण माझी एकाग्रता घालवते. लेख वा पुस्तकातून अनुवादक पालकत्वाच्या प्रश्नार्थक खुणा अशा

तऱ्हेने उदारपणे पसरवतो, जे माझ्या मते ते लेखकावर अतिक्रमण होते व वाचक म्हणून माझ्या स्वातंत्र्यावर घाला घालते.

मला एकदा कोर्टातून तज्ञ म्हणून, आमंत्रण आले होते. तेथील काही काळाच्या विश्रांतीमध्ये, दोन सुशिक्षित व सुसंस्कृत स्त्रियांनी पक्षकाराच्या बाबतीतले वकीलाचे चढेल वागणे दाखवले, त्याकडे माझ्या एक तज्ञ सहकाऱ्याने माझे लक्ष वेधले. गंभीर लेख लिहिणाऱ्या लेखकांपेक्षा, ही वागणूक जास्त उद्धट नव्हती. खरोखर ही वागणूक इतकी उद्धट होती, की कोणालाही ती बघून दुःख झाले असते. सर्व प्रतिष्ठा विसरून लेखक, फार नम्रपणाचा आव आणून टीका करत किंवा एकदम उलटे, म्हणजे नको इतक्या धीटपणे त्याना झोडत. तसेच पक्षकार आणि वकील एकमेकांशी वागत. माझ्या होणाऱ्या जावयाबद्दल माझ्या मनात असेच विचार येत. बेजबाबदारपणामुळे, वाईट हेतूमुळे आणि सर्व प्रकारच्या गुन्हेगारी प्रवृत्तीमुळे बसणाऱ्या शिव्या, हे गंभीर लेखांचे नेहमीचे दागिने आहेत. तरुण डॉक्टरांना असे लिहावेसे वाटते, हे अती आहे. लेखकांच्या तरुण पिढीच्या नीतिमत्तेवर याचे पडसाद उमटल्याशिवाय रहात नाहीत. त्यामुळे गेल्या दहा पंधरा वर्षातील आपल्या साहित्यातील नवीन पुस्तकांचे मला जराही आश्चर्य

वाटत नाही. गॅलनभर व्होडका पिणारे नायक आणि उत्तान नायिका!

मी फ्रेंच पुस्तके वाचतांना उघड्या खिडकीबाहेर डोकावतो. मला टोकेरी कुंपण दिसते. दोनतीन झाडे दिसतात. कुंपणापलीकडे रस्ता, शेत व सदाहरित जंगलाचा मोठा पट्टा दिसतो. मला कुंपणावर चढणारी, चिंध्या पांघरलेली दयनीय मुले माझ्या टक्कलाकडे बघून हसताना पाहून, मजा वाटते. त्या छोट्या चमकत्या डोळ्यात मला ते ‘ए टकल्या’ म्हणून चिडवताना दिसतात. माझ्या कमावलेल्या नावाचे व प्रसिद्धीचे त्याना काहीच पडलेले नसते.

आता रोज मला भेटायला लोक येत नाहीत. मी फक्त माझा शिपाई, निकोलाय व प्योट्र इग्नाटीएव्हीचच्या भेटींबद्दल बोलतो आहे. निकोलाय फक्त मेजवानी असेल, तर येतो. कधी कामासाठी तर कधी फक्त मला भेटायला येतो. तो थोडीशी दारू पिऊन येतो. पण हिवाळ्यात असे कधीच होत नाही.

मी पुढच्या हॉलमध्ये त्याला भेटायला येत विचारतो, ‘‘काय कसे काय?’’

तो त्याच्या छातीवर हात दाबत माझ्याकडे प्रेमाने बघत म्हणतो, “महाशय, देव मला शिक्षा करो. माझ्या अंगावर वीज पडो. आपण आनंद साजरा करू.”

तो हावरटपणे खांद्यावर, हातांवर माझे चुंबन गेतो.

मी त्याला विचारतो, ‘तुझे सर्व ठीक चालले आहे का?”

“महाशय, देव आहे तोपर्यंत --- “

तो देवाच्या शपथा घेत रहातो. मी थोड्याच वेळात त्याला कंटाळतो आणि त्याला स्वयंपाकघरात जेवण्यासाठी पाठवून देतो. प्योट्र इग्नाटीएव्हीच मेजवानीच्या दिवशी मला बघायला व माझ्याबरोबर त्याच्या  विचारांची देवघेव करायला येतो. तो त्याच्या एकदम मऊ, बारीक, पुस्तकी आवाजात, त्याने वाचलेल्या पुस्तकांबद्दल व मासिकांबद्दल त्याला वाटणारे रुचीपूर्ण काही व मसालेदार बातमीवजा चुटके मला सांगत रहातो. या गोष्टी साधारण एकसारख्या असतात. जसे की --- एक फ्रेंच मनुष्य काही शोध लावतो. दुसरा जर्मन मनुष्य त्याला पकडतो व सांगतो की हा शोध १८७० साली एका अमेरिकनाने आधीच लावलेला आहे. तिसरा जर्मन माणूस त्या दोघांनाही अजून उच्च रीत्या फसवून असे सांगतो की ते दोघे म्हणजे फसवी जोडी

असून, त्यांनी सूक्ष्मदर्शक यंत्राखालील गडद द्रव्य म्हणजे हवेचे बुडबुडे समजून, तो शोध लावल्याचा दावा करतो. मी हसणे अपेक्षित असते, तेव्हा प्योट्र इग्नाटीएव्हीच प्रत्येक गोष्ट लांबण लावून सांगतो. जणू काही तो त्याचा शोधनिबंध वाचतांना टीकेच्या मुद्द्यांना प्रत्युत्तर देतो आहे आणि त्याच्या संदर्भसूचीमधील सर्व काही बरोबर असल्याची ग्वाही देतो आहे. कधीकधी तो आमच्याबरोबर जेवायला थांबतो. मग जेवणभर तो त्याच्या मसालेदार गोष्टी सांगत बसतो. त्यामुळे टेबलावरील सर्वजण कंटाळतात. जर लिझा आणि अलेक्झांडर बाख आणि ब्राहम्सच्या सुरावटींबद्दल बोलू लागले, तर तो नम्रपणे मान खाली घालून वरमतो. आमच्यासारख्या गंभीर माणसांसमोर असल्या बाष्कळ गोष्टी बोलल्या जाव्यात, याची त्याला लाज वाटते.

माझ्या आताच्या मनस्थितीत, मला त्याचा कंटाळा येण्यासाठी पाच मिनिटे पुरेशी असतात. जसे काही मी त्याला अनादीकालापासून ऐकतो आहे, असा त्या बेकार माणसाचा मी द्वेष करू लागतो. मी त्याच्या मऊ, पुस्तकी भाषेपासून पळ काढायला बघतो. त्याच्या गोष्टी मी मूकस्तंभासारख्या ऐकतो --- त्याला माझ्याबद्दल आदर आहे आणि तो फक्त मला आनंद देण्यासाठीच बोलतो. मी त्याच्याकडे शून्यवत पहात रहातो, जसे

काही मला त्याच्यावर भूल घालायची आहे आणि मी असे बोलायचा विचार करतो आहे, “निघून जा. निघून जा. निघून जा.” पण त्याला माझ्या मनातले समजत नाही व तो तिथेच रहातो. तिथेच रहातो. तिथेच रहातो ---

तो माझ्याबरोबर असेपर्यंत, माझे तेच विचार चालू रहातात. ‘असे शक्य आहे की मी जेव्हा मरेन, तेव्हा तो माझी जागा घेईल.’ माझ्या कल्पनेतील माझा बिचारा व्याख्यानाचा हॉल वसंत ऋतु समाप्त झालेल्या वाळवंटासारखा दिसतो आणि मी प्योट्र इग्नाटीएव्हीचबरोबर, दुःखी, शांत व वाईट मनस्थितीत दिसू लागतो, जसे काही त्याच्यासाठी मी जबाबदार नसून, तोच आहे. जेव्हा तो त्याच्या सवयीप्रमाणे, जर्मन शास्त्रज्ञांची स्तुती करू लागतो, तेव्हा पूर्वीप्रमाणे मी ते चांगल्या विनोदी पद्धतीने घेऊ शकत नाही. मी रागावून ओरडतो,

“तुझे जर्मन गाढव आहेत --- “

हे अशा एका प्रसंगासारखे झाले, जेव्हा कैलासवासी प्राध्यापक निकीता क्रायलोव्ह एकांतात पिरोगोव्हबरोबर पोहतांना पाणी फार गार असल्याने चिडली व तिने ‘नालायक जर्मन!’ अशा शब्दात शिव्या दिल्या. मी प्योट्र इग्नाटीएव्हीचबरोबर वाईट वागलो. तो निघून गेला व त्याची करडी टोपी मला

कुंपणापलीकडे खिडकीतून दिसली, तेव्हा मला त्याला हाक मारून सांगायचे होते, “माझ्या आवडत्या माणसा, मला क्षमा कर.”

आमची हिवाळ्यातील रात्रीची जेवणे कंटाळवाणी असतात. मला आवडत नसे व मी द्वेष करत असे तो अलेक्झांडर, आमच्याबरोबर रोज जेवत असे. आधी मला त्याचे तिथे असणे शांतपणे सहन होत असे. पण आता मी त्याच्यावर तोंडसुख घेतो. त्यामुळे माझी बायको व लिझा लाजत असत. मला राग येऊन, मी काहीही मूर्खासारख्या गोष्टी बोलत असे. मी त्या का बोलत असे, ते मलाच समजत नसे. मी एकदा त्याच्याकडे खूप वेळ रागाने बघत होतो. आणि मग काही कारण नसतांना त्याच्या अंगावर ओरडलो,

“गरुड कोंबड्यांपेक्षा खालून उडू शकतात.

पण कोंबड्या कधी ढगांमधून उडू शकत नाहीत.”

आणि सर्वात राग येणारी गोष्ट कुठली असेल तर आलेक्झांडर कोंबडा गरुड प्राध्यापकापेक्षा फारच चलाख असल्याचे सिद्ध होई. माझी बायको आणि मुलगी त्याच्या बाजूने असल्याचे माहिती असल्याने, तो असे प्रकार करतोः तो माझ्या

शिव्या शांतपणे ऐकत रहातो. [ म्हातारा काहीतरी पचकला. त्याच्याशी बोलून काय उपयोग आहे? ] किंवा तो चांगल्या स्वभावाचा असल्याने, माझे हसे करतो. मनुष्य किती निगरगट्ट बनू शकतो, हे बघून मला आश्चर्य वाटते. मी जेवणभर असे स्वप्न बघू शकतो, की अलेक्झांडर असले साहस करतो आहे आणि माझ्या बायकोला व मुलीला त्यांची चूक कळून येते आहे व मी त्यांना कसे टोमणे मारतो आहे. माझा एक पाय स्मशानात असतांना मी अशी वेड्यासारखी स्वप्ने बघतो आहे!

मला आधीच माहिती आहे, आता गैरसमज होतो आहे.

दुसऱ्या दिवशीचा एक प्रसंग मी सांगतो.

मी माझ्या खोलीत बसून पाईप ओढतो आहे. नेहमीप्रमाणे माझी बायको येते, बसते आणि बोलायला सुरवात करते की अजून थोडे गरम आहे, मला वेळ आहे तर खार्कोव्हला जाऊन, अलेक्झांडर हा कशा प्रकारचा माणूस आहे, ते शोधून काढ.

मी कबूल करून म्हणतो, “ठीक आहे मी जातो --- “

माझी बायको माझ्यावर खूश होते. उठून दाराशी जाते, पण परत येऊन म्हणते,

“अजून एक काम आहे. मला माहिती आहे की तू रागावशील. पण तुला सावध करणे माझे कर्तव्य आहे. मला माफ कर, निकोलाय स्टेपानयच. पण आपल्या शेजाऱ्यांमध्ये व ओळखीच्या लोकांमध्ये चर्चा सुरु झाली आहे की तू कात्याकडे फारच सारखा जातोस. ती शहाणी व सुशिक्षित आहे. माझे याबद्दल काही दुमत नाही. एखाद्याला तिच्याबरोबर वेळ घालवायला आवडत असेल. पण तुझ्या वयाला व तुझ्या सामाजिक स्थानाला, तिच्या श्वासात आनंद मिळावा, हे जरा विचित्र आहे. शिवाय तिची कीर्ती अशी आहे, की --- “

माझ्या मेंदूत अचानक रक्त उसळते. माझ्या डोळ्यातून अंगार बाहेर पडू लागतो. मी उडी मारतो व डोके दाबून, पाय वाजवत माझ्या नसलेल्या आवाजात किंचाळतो,

“मला एकट्याला राहू दे. मला एकट्याला राहू दे. चालती हो.”

माझा चेहरा बहुधा भयानक झाला असावा. आवजही विचित्र झाला असावा. कारण माझी बायको अचानक ती, ती नसल्यासारखी पांढरी पडली व जोराने रडू लागली. आमचे आवाज ऐकून, लिझा, आलेक्झांडर व येगोर धावून आले ---

मी ओरडलो, ’’मला एकट्याला राहू दे. चालते व्हा.’’

माझे पाय जणू नसल्यासारखे, बधीर झाले. मी कुणाच्या तरी हातात पडल्यासारखे मला वाटले. मी काही हुंदके ऐकले. आणि मी चक्कर येऊन पडलो. दोन तीन तास तसाच होतो.

आता कात्याबद्दल. ती मला रोज संध्याकाळी फोन करते. आणि शेजारी व ओळखीच्या लोकांना हे माहिती आहे. ती मिनिटभर येऊन मला फेरी मारण्यासाठी घेऊन जाते. तिच्याकडे या उन्हाळयात घेतलेला तिचा स्वतःचा घोडा व चारचाकी आहे. सहसा ती मोठ्या टेचात रहाते. तिने मोठी बाग असलेले, वेगळे उन्हाळयाचे घर भाड्याने घेतले आहे. शहराच्या जागेतील फर्निचर तेथे हलवले आहे. तिच्याकडे दोन नोकराणी व टांगेवाला आहे. मी नेहमी तिला विचारतो,

‘‘कात्या, तू तुझ्या वडिलांनी ठेवलेले सगळे पैसे उधळून टाकणार आहेस का?’’

ती उत्तरते, ‘‘आपण काय ते बघू.’’

‘‘अग मुली, पैशांच्या बाबतीत गंभीर दृष्टीकोन असणे गरजेचे आहे. त्या चांगल्या माणसाने तो प्रामाणिकपणे मिळवलेला आहे.’’

“तुम्ही ते आधीच सांगितले आहे. मला माहिती आहे.”

पहिल्यांदा आम्ही शेतांमधून व नंतर माझ्या खिडकीतून दिसणाऱ्या सदाहरित जंगलात फिरतो. सैतान माझ्या कानात सांगत असतो, की मी तीन चार महिन्यांनी मेल्यावर हे पाईन आणि फर, आकाशातील पक्षी आणि तेजस्वी ढग यांना माझी उणीव जाणवेल. पण मला अजूनही निसर्ग सुंदर दिसतो. कात्याला टांग्याचा प्रवास आवडतो. हवा छान असल्याने, ती खूश आहे. मी तिच्याशेजारी बसलो आहे. ती चांगल्या मनस्थितीत आहे आणि काही टोकेरी बोलत नाही.

ती म्हणते, “निकोलाय स्टेपानयच, तू एक खूप चांगला मनुष्य आहेस. अशी माणसे विरळा असतात. तुझी भूमिका कोणताही नट करू शकणार नाही. माझी किंवा मिखाईलची भूमिका एखादा फालतू नटदेखील करू शकेल. पण तुमची भूमिका कोणीच करू शकणार नाही. मी तुमचा हेवा करते. मी तुमचा खूपच हेवा करते. कारण माझे हे काय चित्र आहे? काय?”

ती क्षणभर विचार करून प्रश्न करतेः

“मी एक निराशावादी घटना आहे --- बरोबर, निकोलाय स्टेपानयच?”

मी उत्तरतो, ”बरोबर.”

“हं --- मी काय करू?”

मी तिला काय उत्तर देणार? ’काम कर ’किंवा ‘तुझ्याकडे आहे, ते गरिबांना दे.’, ‘स्वतःला जाण’, हे सांगणे सोपे आहे. जणू हे सांगणे सोपे असल्याने, काय उत्तर द्यावे, ते मला कळत नाही.

माझ्या बरोबरीचे प्रॅक्टीस करणारे मित्र जेव्हा वैद्यकीय उपचार पद्धती  शिकवतात, तेव्हा प्रत्येक व्यक्ती वेगळी असते, असे सांगतात. वैद्यकीय पुस्तकात दिलेले उपचार सर्वसामान्य लोकांना लागू पडतात. पण काही विशेष लोकांच्या बाबतीत ते योग्य ठरत नाहीत. तेच नैतिक आजाराबद्दलही लागू आहे.

पण मला उत्तर देणे तर भाग होते. मग मी म्हणालो,

“अग मुली, तुला भरपूर रिकामा वेळ असतो. तू काही काम शोधून काढले पाहिजेस. तुला बोलावणी येत आहेत, तर तू परत अभिनय का सुरु करत नाहीस?”

“मी करू शकत नाही.”

“तुझा स्वर आणि पद्धत दर्शवते आहे, की तू बळी गेली आहेस. मला हे आवडत नाही. ही तुझी चूक आहे. तू लोकांवर व

त्यांच्या पद्धतीवर रागवायला सुरवात केलीस. पण ते सुधारावेत म्हणून तू काही प्रयत्न केले नाहीस. तू वाईटाशी लढा दिला नाहीस. तू दमलीस आणि तुझ्या प्रयत्नांचा बळी ठरलीस. पण ती तुझी दुर्बलता होती. तेव्हा तू तरुण, अननुभवी होतीस. पण आता सर्व काही वेगळे होईल. खरच, परत प्रयत्न कर. तू काम करून त्या पवित्र कलेची सेवा कर --- "

कात्या मध्येच बोलते, "निकोलाय स्टेपानयच, तुमचा खरा चेहरा लपवू नका. आपण नेहमीकरता हे कबूल करून टाकू, की आपण नटांबद्दल, नट्यांबद्दल किंवा लेखकांबद्दल बोलू शकतो. पण आपण कलेला बाजूला ठेवू. तुम्ही दुर्मिळ, नवलपूर्ण माणूस आहात. पण तुम्हाला कलेची नीटशी जाण नाही, कारण तुम्ही तुमच्या सद्सदविवेकबुद्धीला स्मरून, तिला पवित्र म्हणता. तुम्हाला कलेची जाण तर नाहीच पण तिचा कानही नाही. तुम्ही आयुष्यभर तुमच्या कामात व्यग्र असल्याने, तुम्हाला कलेसंबंधी काही जाणून घ्यायला वेळच झाला नाही. सहसा --- मला कलेबाबतची ही बोलणी आवडत नाहीत. मला खरच आवडत नाहीत. तिला खूप क्षुद्र समजले गेले आहे, त्याबद्दल आभारी आहे." ती उदास झाली होती.

"तिला क्षुद्र कोणी लेखले?"

“कुणी पिऊन, तर वर्तमानपत्रांनी अती परिचयामुळे व हुशार लोकांनी तत्वज्ञानामुळे, तिला कमी लेखले आहे.”

“तत्वज्ञानाचा याच्याशी काही संबंध नाही.”

“हो. आहे. जर कोणी तत्वज्ञ होऊन विचार करू लागले, तर त्यांना काही कळत नाही.”

फार वादविवाद होण्याच्या आत, मी विषय बदलण्याची घाई केली व मग बराच वेळ शांत राहिलो. जेव्हा आम्ही जंगलातून बाहेर आलो व कात्याच्या घराकडे जाऊ लागलो, तेव्हा मी परत मूळ विषयाकडे वळून विचारले,

“तू अजून मला उत्तर दिले नाहीस. तुला अभिनय का करायचा नाही?”

ती ओरडते व सर्वांगाने लाजते. “निकोलाय स्टेपानयच, शेवटी ते क्रूर आहे! तुम्हाला मी सत्य मोठ्याने सांगायला हवे आहे का? ठीक आहे, जर त्यात तुम्हाला सुख असेल तर --- , माझ्याकडे त्या प्रकारची बुद्धिमत्ता नाही आणि --- आणि त्याबद्दल प्रचंड गर्वदेखील नाही!”

हे कबूल केल्यावर, तिने माझ्यापासून तोंड फिरवले. तिचे थरथरणारे हात लपवण्यासाठी हातात लगाम घट्ट धरला.

तिचे घर जवळ आल्यावर, आम्हाला काही अंतरावरून, गेटशी घुटमळणारा व अधीरपणे आमची वाट पहाणारा मिखाईल दिसू लागला.

कात्या रागाने बोलली, “परत हा मिखाईल फ्येडोरोव्हीच! कृपया, माझी त्याच्यापासून सुटका करा. मला त्याचा कंटाळा आला आहे. त्याचे खूप लाड झाले. आता बास!”

मिखाईलने केव्हाच परदेशी जायला हवे होते. पण तो दर आठवड्याला त्याचे जाणे लांबवत रहातो. अलीकडे त्याच्यात काही बदल घडून आलेला आहे. तो काहीसा चिमटीत सापडल्यासारखा झाला आहे. आता त्याला वाईन चढते. असे पूर्वी कधी होत नसे. त्याच्या काळ्या भुवया आता करड्या होऊ लागल्या आहेत. जेव्हा आमचा टांगा गेटशी थांबला, तेव्हा तो त्याचा आनंद व अधीरपणा लपवू शकला नाही. तो उत्साहाने भारला गेला. तो मला व कात्याला टांग्यातून उतरायला मदत करू लागला. घाईने प्रश्न विचारू लागला. हसून त्याचे हात चोळू लागला. आणि ते शांत, सभ्य, पवित्र काहीतरी त्याच्या चेहराभर पसरण्यापूर्वी त्याच्या डोळ्यात दिसू लागले. तो आनंदी होता. आणि त्याच वेळी त्याला रोज संध्याकाळी कात्याकडे येण्याची लाजही वाटत होती. तो त्याच्या येण्याचे समर्थन काही

वेड्यावाकड्या पद्धतीने करू बघत होता, जसे की मी कामासाठी इथून चाललो होतो. तेव्हा इथे थोडा थांबलो.”

आम्ही तिघे आत गेलो. आधी आम्ही चहा घेतला. मग टेबलावर दोन मोठे पत्त्यांचे संच, मोठा चीजचा तुकडा, फळे व शँपेनची बाटली पडली होती. आता आम्ही त्याच त्याच विषयावर बोलू लागलो. विद्यापीठ, विद्यार्थी, साहित्य, थिएटर, हे सगळे त्यात होते. गप्पांबरोबर हवा वाईट व दाट होऊ लागली. आता हिवाळ्यातील दोन बेडकांमुळे नव्हे, तर तिघांमुळे! बाजासारखे हसणे व मखमली ट्रम्पेटमुळे ती विषारी होऊ लागली. आम्हाला वस्तू पुरवणाऱ्या नोकराणीला सुद्धा नकोसे, मोडल्यासारखे विनोदी हसणे ऐकू येत होते. हा, हा, हा ---

## पाच

लोकांमध्ये चिमणी रात्र म्हणून ओळखला जाणारा --- गडगडाट, विजा चमकणे, वारा असलेला पाऊस सुरु झाला.

मध्यरात्र उलटून गेल्यावर अचानक मी जागा झालो. अंथरुणातून उडी मारून बाहेर आलो. काही कारणाने मला असे वाटले, की मी आता मरणार आहे. असे का वाटले बरे? माझे मरण जवळ आले आहे, अशा काही संवेदना माझ्या शरीरात नव्हत्या. पण माझा आत्मा भीतीने इतका हादरला होता, की मी जणू काही प्रचंड, वाईटाची चाहूल देणारा उजेड पाहिला असावा.

मी पटकन दिवा लावला. सरळ जगमधून पाणी प्यायलो आणि खिडकी उघडायला धावलो. गवताचा आणि कसला तरी खूप चांगला वास येत होता. मला कुंपणाची अणकुचीदार टोके दिसली. खिडकीतून झोपाळू, बोडकी झाडे दिसली. रस्ता, जंगलाचा अंधारी पट्टा, आकाशातील शांत व प्रकाशित चंद्र, आणि निरभ्र आकाश दिसले. पूर्ण शांतता, एकही पान हलत नव्हते. मला असे वाटले की सर्व काही माझ्याकडे पहाते आहे आणि मी कसा मरणार, ते ऐकते आहे.

मला भीती वाटली. मी खिडकी लावून घेतली. मला मनगटावर माझी नाडी लागेना. मी कानशीलांवर तपासले. मग हनुवटीखाली व परत मनगटावर आणि सर्व ठिकाणी गार होते. दमट आणि घामेजलेले! मग मला धाप लागली. माझे शरीर थरथरतले. आतून सर्व हलले. माझ्या चेहऱ्यावर आणि टक्कलावर जळमटे लागल्यासारखे वाटले.

काय करावे? कुटुंबाला बोलवावे? नाही, काही गरज नाही. माझी बायको आणि लिझा आल्या, तर त्या काय करतील?

मी माझे डोके उशीत लपवतो, डोळे मिटतो आणि थांबतो. थांबतो --- माझी पाठ गार पडली आहे. ती आत जाते आहे असे वाटते आहे. मला मरण नक्की मागच्या बाजूने येणार आहे. फसवे, लबाड ---

रात्रीच्या शांततेत, अचानक ‘कि -- वी –- कि –- वी’ असा आवाज येतो. मला कळत नाही, की तो माझ्या छातीतून येतो आहे, की बाहेरून?

‘कि –- वी –- कि –- वी’

बापरे, किती भीतीदायक! मी अजून पाणी पितो. पण डोळे उघडायला व डोके उचलायला घाबरतो. मी भीतीमुळे नेणीवेच्या

अवस्थेत जातो. मला कळत नाही, की मी का घाबरतो आहे. कारण मला जगायचे आहे. अजून मला माहिती नसलेले दुःख, दबा धरून बसलेले आहे का?

मी हाका मारल्यावर वरच्या मजल्यावर, कुणीतरी कण्हते किंवा हसते आहे --- मी ऐकतो. नंतर थोड्या वेळाने मला जिन्यावरून पदरव येतो. कोणीतरी घाईने खाली येते आहे. कोणीतरी दाराशी ऐकत थांबते.

मी ओरडतो, ‘कोण आहे?”

दार उघडते. मी धीटपणे डोळे उघडतो आणि चेहरा उतरलेल्या व डोळ्यात भीती दाटलेल्या माझ्या बायकोला बघतो.

ती विचारते, “निकोलाय, तू अजून झोपला नाहीस?

“हे काय आहे?”

“कृपया, जा आणि लीझाला काय झाले आहे, ते बघ --- ”

मी एकटा नसल्याने खूश होऊन म्हणतो, “ठीक आहे --- आनंदाने --- ठीक आहे --- आता जातो.”

मी माझी बायको सांगते, ते ऐकतो. पण माझ्या रागामुळे मला काही कळत नाही. जिन्यातील पायऱ्यांवर तिच्या हातातील

मेणबत्तीच्या उजेडाचे कण सांडतात. आमच्या लांब सावल्या हलतात. माझ्या गाऊनमध्ये माझे पाय अडकतात. मला श्वास लागतो. मला असे वाटत रहाते, की कुणीतरी माझा पाठलाग करत आहे आणि पाठीकडून मला पकडायला बघत आहे. मला वाटते, आता जिन्यात इथल्या इथे मी मरणार आहे. अगदी आताच --- " पण जिना आणि इटालियन खिडकी असलेला काळोखी पॅसेज आमच्या मागे रहातो आणि आम्ही लीझाच्या खोलीत जातो. ती तिच्या पलंगावर रात्रीच्या गाऊनमध्ये बसलेली आहे. तिचे पाय खाली लोंबत आहेत. ती कण्हते आहे.

आमच्या मेणबत्तीमुळे डोळे दिपल्याने, तिचे डोळे बारीक करत, ती पुटपुटते आहे, "अरे देवा --- अरे देवा! मला शक्य नाही. मला शक्य नाही --- "

"अग लिझा, माझ्या मुली, काय झाले?"

मला बघून ती रडू लागते व माझ्या गळयात पडते.

ती हुंदके देत बोलते, 'माझे दयाळू पपा --- माझे सर्वात आवडते पपा --- !

"मला समजत नाही मला काय झाले आहे --- माझे हृदय आजारी आहे."

ती मला मिठी मारते.  ती लहान असतांना बोलायची तसे कोवळे शब्द बोलते.

मी म्हणतो, “शांत हो, बाळा, देव तुझे भले करो. तू रडता कामा नयेस. माझेही हृदय आजारी आहे.”

मी तिला पांघरूण घालतो. माझी बायको तिला पेय देते. आम्ही दोघे एकमेकाना खांदा घासत, गोंधळून तिच्या अंथरुणाशेजारी उभे रहातो. त्या क्षणी मला आठवण येते, की कसे आम्ही आमच्या मुलांना एकत्र अंघोळी घालायचो.

माझी बायको मला विनवणी करते, “तिला मदत कर. मदत कर. काहीतरी कर.!”

पण मी काय करणार? मी काही करू शकत नाही. त्या मुलीच्या हृदयावर काही ओझे आले आहे. पण मला काय करायचे, काही कळत नाही. मी पुटपुटतो,

“घाबरू नको. ते जाईल. झोप. झोप.”

आमच्या अंगणातून अचानक कुत्र्याचे केकाटणे ऐकू येते. पहिल्यांदा हळू आणि तुटक व मग जोराने, अशा दोन आवाजात! माझा असल्या शकुनांवर कधी विश्वास नसतो. जसे की कुत्र्याचे केकाटणे, घुबडाचे चित्कार इत्यादी. पण आता माझ्या हृदयात

दुःखाची घंटी वाजते आहे. आणि मी कुत्र्याच्या केकाटण्याचा काही अर्थ लावू बघतो आहे.

मी विचार करतो, ‘हे बेकार आहे. असा एका प्राण्याचा दुसऱ्यावर परिणाम होणे --- माझ्या मेंदूवरील ताण बायकोकडे पोचतो. लीझाकडे, कुत्र्याकडे देखील पोचतो --- हे असे जोडले जाणे, म्हणजे काही अंतस्थ लागेबांधे असावे. कसली तरी, नको ते घडणार असल्याची चाहूल --- ‘

थोड्या वेळाने मी लीझासाठी कुठली औषधे घ्यायची हे लिहायला माझ्या खोलीत गेलो, तेव्हा मला मी आता लवकरच मरणार आहे, असे वाटेनासे झाले. मला फक्त थोडा जडपणा वाटत होता व दमल्यासारखे वाटत होते. तेव्हा मी अचानक मरणार नसल्याबद्दल, मला वाईट वाटले. लीझाला कुठले औषध द्यावे याचा विचार करत, पण खूप वेळ मी खोलीमध्ये नुसताच उभा होतो. छतातून कण्हल्यासारखा येणारा आवाज बंद झाला आणि मी काहीही औषध न देण्याचे ठरवले. पण तिथेच उभा राहिलो.

तिथे इतकी भयाण शांतता होती, की कुण्या लेखकाने म्हटल्या प्रमाणे, तुमच्या कानातून आवाज येत होते. वेळ अगदी हळू जात होता. खिडकीत पडलेले चंद्राचे चांदणे गोठल्यासारखे

त्याची जागा बदलत नव्हते. पहाट व्हायला अजून बराच अवकाश होता.

पण आता कुंपणाजवळील गेट वाजू लागले. कुणीतरी झाडाची फांदी तोडून मुद्दाम खिडकीवर आपटत होते.

मी कुजबुजता स्वर ऐकला. “निकोलाय स्टेपानयच! निकोलाय स्टेपानयच!”

मी खिडकी उघडली. मला स्वप्न पडत होते का? खिडकीत भिंतीला टेकून काळ्या कपड्यातील एक स्त्री उभी होती. तिच्यावर चंद्रप्रकाश पडला होता. ती माझ्याकडे मोठे डोळे रोखून बघत होती. तिचा चेहरा कडक पण मलूल आणि संगमरवरी असल्यासारखा, काही वेगळाच दिसत होता. तिची हनुवटी थरथरत होती.

ती म्हणाली, “मी कात्या आहे. मी --- कात्या!”

चंद्रप्रकाशात सगळ्या स्त्रियांचे डोळे मोठे आणि काळे दिसतात. लोक उंच आणि मलूल दिसतात. बहुधा त्यामुळेच मी तिला प्रथम ओळखले नाही.

“काय झाले?”

ती म्हणाली, “मला माफ करा. मला का कुणास ठाऊक, एकाएकी हृदयात असह्य दुखू लागले. मला ते सहन होईना. म्हणून मी इथे आले --- तुमच्या खिडकीत उजेड दिसला --- आणि मी खिडकीचे दार खटखटवायचे ठरवले --- मला माफ करा --- ओहो, मला हृदयात किती वेदना होत आहेत, हे तुम्हाला कळले असते तर! तुम्ही आता काय करत आहात?”

“काही नाही --- मला झोप येत नाही आहे.”

“मला एक प्रकारची पुढची चाहूल लागते आहे, पण ती काही खरी नव्हे.”

तिच्या भुवया चढतात. तिच्या डोळ्यात अश्रू भरतात. तिचा पूर्ण चेहरा खूप दिवसात न दिसलेल्या, पण ओळखीच्या सत्यप्रियतेने भरून जातो.

ती दोन्ही हात पसरून, माझ्याकडे येत विनवणीच्या स्वरात म्हणते, “निकोलाय स्टेपानयच, माझ्या प्रिय, मी तुमच्याकडे मागणे मागते, जर तुम्ही माझी मैत्री नाकारत नसाल आणि माझ्या मनात तुमच्याविषयी आदर असेल, तर मी सांगते ते ऐका.”

“ते काय आहे?”

“माझ्याकडून पैसे घ्या.”

“तुझा पुढे काय विचार आहे? मला तुझ्या पैशांची गरज का असेल?”

“तुम्ही कुठेतरी जाऊन इलाज करून घ्या --- तुम्हाला बरे होण्याची गरज आहे. तुम्ही ते घ्याल का? हो? प्रिय, तुम्ही हो म्हणा.”

ती माझ्या चेहऱ्यावरून नजर फिरवते आणि परत बोलतेः

“तुम्ही ते घ्याल का? हो?”

“नाही, मुली, मी नाही घेणार. पण मी तुझा आभारी आहे.”

ती माझ्याकडे पाठ वळवते आणि डोके खाली घालते. मी तिला अशा शब्दात बहुधा नकार दिला असावा, की तिला त्याबद्दल पुढे काही बोलणे अशक्य व्हावे.

मी म्हणतो, “घरी जाऊन झोप. आपण उद्या भेटू.”

ती उदासीनतेने म्हणते, “म्हणजे तुम्ही मला तुमची मित्र समजत नाही.”

“मी असे काही म्हणालो नाही. पण तुझ्या पैशांचा मला आता काही उपयोग नाही.”

एकदम आवाज खाली आणून, ती म्हणते, “माफ करा. मी तुम्हाला समजू शकते --- माझ्यासारख्या मुलीला तुम्ही ऋणात ठेवू इच्छिता --- निवृत्त नटी --- ठीक आहे, अच्छा”

आणि ती इतक्या झटकन निघून गेली. मला तिचा निरोप घ्यायलाही वेळ मिळाला नाही.

## सहा

मी खार्कोव्हमध्ये आहे.

माझ्या आताच्या मनस्थितीशी भांडणे, हे निरुपयोगी आणि माझ्या शक्तीपलीकडील आहे. मी ठरवले आहे की माझ्या आयुष्यातील शेवटचे दिवस, मला कुणी कृत्रिम पद्धतीने भेटू नये. जर माझ्या कुटुंबाबद्दलचा माझा दृष्टीकोन बरोबर नसेल, मला ते माहिती आहे, तर मी ते सांगतील ते करायचा प्रयत्न करायला तयार आहे. जर ते खार्कोव्हमध्ये जा, असे असेल, तर मी खार्कोव्हला जाईन. शिवाय अलीकडे मी सर्व बाबतीत, इतका बेफिकीर झालो आहे, की मला खार्कोव्ह काय, पॅरीस काय किंवा बर्डीचेव्ह काय, काही फरक पडत नाही.

मी इथे दुपारो पोचलो आणि स्मशानापासून फार लांब नसलेल्या हॉटेलमध्ये आलो. रेल्वे गाडीत मी आजारी झालो. आणि मला मळमळीचा त्रास झाला. त्यामुळे आता मी अंथरुणावर परत ओकारी येण्याची वाट बघत, माझे डोके धरून बसलो आहे. मला येथील प्राध्यापकांना जाऊन भेटले पाहिजे. पण मला तितकी ओढ नाही व शक्तीही नाही.

माझ्या मजल्यावरील म्हातारा नोकर, मला चादर हवी आहे का, विचारायला येतो. मी त्याला पाच मिनिटे थांबवून घेतो आणि अनेक प्रश्न विचारतो. मी ज्याच्यामुळे इथे आलो आहे, त्या अलेक्झांडरबद्दल प्रश्न विचारतो. तो नोकर खार्कोव्हचाच रहाणारा असतो व त्याला त्याबद्दल खूप माहिती असते. पण अलेक्झांडर असे नाव असलेला कुणी त्याला माहिती नसतो. मी अलेक्झांडरची काही मालमत्ता आहे का, ते विचारतो --- पण तेच उत्तर.

पॅसेजमधील घड्याळ एकचा टोला देते. मग दोनचा, मग तीनचा --- हे माझे मरणाची वाट बघत काढलेले आयुष्यातील शेवटचे महिने मला सबंध आयुष्यापेक्षा फार लांबलचक वाटतात. यापूर्वी मला वेळ कधीच एवढा कंटाळवाणा वाटला नव्हता. यापूर्वी मी जेव्हा स्टेशनवर गाडीची वाट बघत असे किंवा परीक्षेच्या वेळी सुपरवायझर म्हणून काम करत असे, तेव्हा मला वेळ युगासारखा भासे. पण आता मी पूर्ण रात्र हालचाल न करता अंथरुणावर बसून घालवू शकतो आणि उद्या व परवाची रात्रदेखील --- अशीच निरस आणि लांबलचक असेल, असे पूर्ण बेफिकीरीने म्हणू शकतो.

पॅसेजमधील घड्याळ पाचचा टोला देते. सहा, सात --- आता काळोख होऊ लागला आहे.

माझ्या गालात ठ्णदिशी कळ येते --- ओकारी येईल असे वाटते. या लहानशा खोलीत बसून करड्या रगात गुंडाळलेल्या मला विचारात बुडवण्यासाठी, मी मला माझ्या पूर्वीच्या दृष्टीकोनात नेतो. म्हणजे मी जेव्हा प्रसिद्ध प्राध्यापक व छुपा समुपदेशक होतो, तेव्हाच्या आठवणी काढतो. मी या स्वस्त टीनच्या वॉशबेसिनकडे का बघतो आहे? आणि या भिकार घड्याळाकडे का लक्ष देतो आहे? हे सगळे माझ्या इभ्रतीला साजेसे आहे का? या प्रश्नांची उत्तरे, म्हणजे माझे हास्य आहे. माझ्या तारुण्यात, मी ज्या मूर्खपणाने उगीचच प्राध्यापकांचे व शास्त्रज्ञांचे महत्व वाढवले, आणि त्या उच्चपदस्थ व्यक्तींनी ते ज्या प्रकारे आनंदाने भोगले, ते  बेकार होते, असे आता मला वाटते. मी प्रसिद्ध आहे. माझे नाव आदराने घेतले जाते. माझी छबी मासिकांमध्ये झळकते आहे. मी माझे चरित्रदेखील एका जर्मन मासिकात वाचले आहे --- पण त्याचे काय एवढे? मी एका परक्या गावात, विचित्र अंथरुणावर बसलो आहे. माझा दुखणारा गाल माझ्या तळव्याने चोळत बसलो आहे --- काही क्षुल्लक कारणावरून माझे कुटुंबीय वाद घालत आहेत. दयाबुद्धी नसलेले

व श्रेय लाटू बघणारे, उन्मत्त रेल्वे कर्मचारी, पासपोर्ट पद्धतीतील असुविधा, बुफे जेवणातील महागडे आणि पौष्टीक नसलेले अन्न, वैश्विक अज्ञान आणि वागण्यातील उद्दामपणा --- हे सर्व आणि अजून बऱ्याच गोष्टी --- सर्व सांगत बसलो तर खूप वेळ जाईल. फक्त त्याच्या गल्लीतील लोकांना माहिती असलेला अलेक्झांडर! एका व्यापाऱ्यापेक्षा मला हे कमी वाटत नाही. मग माझ्या वरचढ हुद्द्याचा प्रभाव इथे कसा पडावा? समजा मी हजारपट प्रसिद्ध आहे, मी नायक आहे, माझ्या मातृभूमीचा सुपुत्र आहे सगळी वर्तमानपत्रे माझ्या आजाराची बातमी छापतात. सहकाऱ्यांकडून, विद्यार्थ्यांकडून व लोकांकडून, मला सहानुभूतीची पत्रे येतात. पण हे सर्व मला विचित्र अंथरुणात, राग आलेला असताना व मी एकटा पडलेला असतांना का वाटते आहे? मी स्वतःला मरण्यापासून परावृत्त करतो. मी पापी आहेच पण मला माझी कीर्ती व प्रसिद्ध नाव आवडत नाही. मला असे वाटते, की मी याने मला फसवले आहे.

मला मळमळत होते, तरी रात्री दहाच्या सुमारास मी झोपलो. मला बराच वेळ चांगली झोप लागली. रात्री एकच्या सुमारस अचानक दारावर टकटक झाली.

“कोण आहे?”

“तार.”

नोकराकडून तार घेतांना मी गुरगुरलो. “तुम्ही ती उद्या आणली असती, तरी चालले असते. आता मला परत झोप लागणार नाही.”

“माफ करा, सर. पण तुम्हाला थोडी जळजळ होत असल्याने मला वाटले, तुम्ही झोपला नसाल.

मी तार उघडली आणि प्रथम सही बघितली. ती माझ्या बायकोची होती. तिला काय हवे आहे?

“काल लिझा आणि अलेक्झांडर यांनी गुप्तपणे लग्न केले. तू परत ये.”

मी तार वाचली व क्षणभर घाबरलो. लिझा व अलेक्झांडर यांनी जे काही केले, त्यामुळे नव्हे, तर त्यांच्या लग्नाची बातमी ज्या दुर्लक्षितपणे मी घेतली, त्यामुळे घाबरलो. असे म्हटले जाते, की तत्वज्ञ व बुद्धिमान माणसे बेदरकार असतात. चूक. बेदरकार असणे हे आत्म्याला झालेला अर्धांगवायू, मरणापूर्वीचे मरण होय.

मी अंथरुणावर लवंडलो आणि वेळ जाण्यासाठी विचार करू लागलो. कसला विचार करावा बरे? मला वाटले सर्व विचार

आधीच करून झाले होते. आता माझे मन ढवळून काढेल, असा काही विचार बाकी नव्हता.

पहाटे मला करण्यासारखे काही नसल्याने, मी गुडघ्यांभोवती हात लपेटून बसलो होतो. मी स्वतःला जाणून घ्यायचा विचार करत होतो. ‘स्वतःला जाणा’ --- काय छान आणि उपयुक्त सल्ला! या सल्ल्याचा कसा उपयोग करावा, हे आजपर्यंत मला कुणी सांगितले नव्हते.

आधी मला जेव्हा कुणाला तरी किंवा मला स्वतःला जाणून घेण्याची इच्छा होती, तेव्हा मी काही केले नाही. त्यात इच्छा होती. पण सर्व काही जर तर होते. तुम्ही मला सांगा, तुम्हाला काय हवे आहे आणि तुम्ही कोण आहात, ते मी सांगेन.

आणि आता मी स्वतःला तपासतो आहे. मला काय हवे आहे? मला प्रेम करण्यासाठी बायको, मुले, मित्र, विद्यार्थी हवे आहेत. माझ्या नावाचा छाप नको आहे, कीर्ती नको आहे. मी सर्वसामान्य माणूस आहे. अजून काय? मला मदतनीस व वारस हवेत. अजून काही नको. मला निदान शंभर वर्षांनी जाग यावी व विज्ञानात काय प्रगती झाली आहे हे समजावे. मला अजून दहा वर्षे --- त्याच्या आसपास --- जगायचे आहे. अजून काय?

अजून काही नाही. मला वाटते, खूप काळ मला वाटते, आणि अजून काही मला वाटू शकत नाही. मी कितीही दूरवर विचार केला, तरी मला हे स्पष्ट आहे, की माझ्या इच्छांमध्ये काही महत्वाची त्रुटी रहाते. विज्ञानाबद्दलच्या प्रगतीच्या माझ्या अंदाजात, माझ्या जगण्याच्या इच्छेत, या विचित्र अंथरुणावर बसण्यात आणि  सतत केलेल्या विचारमंथनातून स्वतःला जाणून घेण्यात, काही तरी सामान्यपणे राहून जाते आणि तेच एकमेव सत्य असते. माझ्यात प्रत्येक विचार आणि भावना वेगळी वास करते. आणि एकंदरीत विज्ञान, साहित्य, थिएटर, विद्यार्थी आणि एकूणच कल्पनाशक्तीने अगदी कसब वापरून काढलेले चित्रही, देवाबद्दलचे माझे मत किंवा सर्वसाधारण कल्पनाही व्यक्त करू शकत नाही.

आणि असे असेल, तर मग काहीच नाही.

अशी गरिबी, आजार, मरणाची भीती, लोकांचा किंवा परिस्थितीचा परिणाम, हे सर्व माझा जगाबद्दलचा दृष्टीकोन बदलून टाकायला व माझ्या आयुष्याच्या आनंदाचे व अर्थाचे तुकडे तुकडे करायला पुरेसे आहे. त्यामुळे माझ्या आयुष्यातील शेवटचा महिना मी गुलाम व तत्सम कोणी असल्यासारखा अंधारात काढला, तर त्यात काही नवल नाही. मी आता बेफिकीर झालो

आहे व आता मला पहाट झालेलीही लक्षात येत नाही. कुठल्याही बाहेरील परिणामांपेक्षा उच्च असे काही मनुष्याला मिळत नाही, तेव्हा जे मिळते ते खरेच मनुष्याला राग यायला, प्रत्येक पक्षात घुबड दिसायला, व प्रत्येक आवाजात कुत्र्याचे केकाटणे ऐकू यायला पुरेसे असते. त्या क्षणी, त्याची आशा वा निराशा, त्याचे लहानमोठे विचार हे फक्त लक्षणांपुरतेच उरतात, बाकी काही नाही.

मी पराभूत झालो आहे. असे असेल, तर विचार करण्यात वा बोलण्यात अर्थ नाही. मी स्वस्थ बसून जे होईल ते पहातो.

सकाळी नोकर माझ्यासाठी चहा व स्थानिक वृत्तपत्र आणतो. मी आपसूकपणे पहिल्या पानावरील बातम्या वाचतो. संपादकीय, सिनेमा परीक्षण, बातम्यांचे विश्लेषण --- बातम्यांमध्ये मला इतर मजकूराबरोबर असे सापडतेः ‘काल आपले  प्रसिद्ध शास्त्रज्ञ व नावाजलेले प्राध्यापक निकोलाय स्टेपानयच अमुक तमुक यांचे जलद गाडीने खार्कोव्हमध्ये आगमन झाले आहे आणि ते अमुक तमुक हॉटेलमध्ये रहात आहेत.’

प्रसंगवशात मोठी नावे तयार केली जातात. पण ती धारण करणारे लोक त्यांचे तेच रहात असतात.  आता माझे नाव खार्कोव्हमध्ये शांततेने घेतले जाते आहे. तीन महिन्यात ते

स्मशानातील दगडावर कोरले जाणार आहे व चकाकणार आहे. तेव्हा मी आधीच मातीत विलीन झालेलो असेन --- दारावर हलकी थाप येते. कोणाला तरी मी हवा आहे.

“कोण आहे? आत या,”

दार उघडते आणि नवलपूर्ण चेहऱ्याने कात्या माझ्यासमोर उभी रहाते.

जिना चढून धाप लागल्याने, जोरात श्वास घेत ती म्हणते, “शुभ सकाळ. तुम्ही मी येण्याची अपेक्षा करत नव्हतात? मी --- मी इथे आले होते.

ती बसते व माझ्याकडे न बघता, भरभर बोलू लागते,

“तुम्ही मला शुभ सकाळ म्हणणार नाही का? मी आले आहे --- मला समजले की तुम्ही या हॉटेलात आहात आणि मी आले.”

मी खांदे थरथरवत बोलतो, “तुला बघून मला आनंद झाला आहे. पण मला नवल वाटते --- तू जणू काही आकाशातून पडली आहेस. तू इथे का आली आहेस?”

“मी? सहज आले आहे.”

शांतता. अचानक ती जोराने उठून माझ्याजवळ येते.

ती पांढरी पडून तिचे हात तिच्या छातीवर ठेवत म्हणते, “निकोलाय स्टेपानयच, मला असे अजून रहाता येणार नाही. ते शक्य नाही. देवदयेने मला या क्षणी लवकर सांगा, मी काय करू? मला सांगा, मी काय करू?”

मी गोंधळून बोललो, “पण मी काय सांगणार? मी काही सांगू शकत नाही.”

तिचा घसा दाटतो. ती थरथरत बोलते, “मला सांगा, मी तुमच्याकडे भीक मागते. मी तुम्हाला खरेच सांगते, मी अशी राहू शकत नाही. हे माझ्या शक्तीपलीकडील आहे.”

ती खुर्चीत कोसळून, हुंदके देऊ लागते. तिचे डोके मागे टाकते. हात हलवते. पाय आपटते. तिची टोपी डोक्यावरून पडते. तिचे केस विस्कटतात.

ती परत याचना करते, “मला मदत करा. मदत करा. मी अशी जगू शकत नाही.”

तिच्या सामानामधून, ती रुमाल काढते आणि त्याबरोबर अनेक पत्रे काढते. ती तिच्या गुडघ्यांवरुन जमिनीवर पडतात. मी

ती उचलतो. त्यातील एकावर मला मिखाईलचे अक्षर दिसते. आणि मी सहजच एक अक्षर वाचतो --- मी प्रेम --- “

मी म्हणतो, “कात्या, मी तुला काही सांगू शकत नाही.”

ती गयावया करत रहाते, “मला मदत करा. मदत करा. मी अशी जगू शकत नाही.”

ती माझ्या हाताचे चुंबन घेत म्हणते, “तुम्ही माझे वडील व एकमेव मित्र आहात. तुम्ही सुशिक्षित, बुद्धिमान, व वयातीत आहात. तुम्ही शिक्षक होतात. मला सांगा, मी काय करू?”

“कात्या, तुला मनापासून सांगतो, मला माहिती नाही --- ”

तिची अवस्था बघून मी कोलमडून पडतो, मला फार लाज वाटते. मी अस्वस्थ होतो.

मी ओढून ताणून हसतो व बोलतो, “आपण न्याहारी करू, कात्या, आता रडू नको.”

आणि बुडत्या आवाजात बोलतो,

“कात्या, थोडेच दिवसात मी नसेन.

ती शोक करत म्हणते, “फक्त एकच शब्द, एक शब्द! मी काय करू?’

मी पुटपुटतो, “तू खरेच, विचित्र आहेस. मला कळत नाही, इतकी हुशार मुलगी आणि अचानक --- तू रडत सुटतेस! --- “

शांतता पसरते. कात्या तिचे केस सारखे करते. टोपी घालते. पत्रे गोळा करून,

तिच्या सामानात ठेवते --- हे सर्व ती सावकाशीने व शांतपणे करते.

तिचा चेहरा, छाती व मोजे अश्रूंनी भिजले आहेत. पण तिचा चेहरा कठोर दिसतो आहे --- मला तिच्याकडे बघून लाज वाटते, की तिच्यापेक्षा मी जास्त सुखी आहे. मरणापूर्वी थोडा वेळ आपल्याला काही कल्पना येते, असे माझे तत्वज्ञ मित्र म्हणतात. तसे माझ्या आयुष्याच्या धूसर प्रकाशात, मला काही जाणवत नाही. पण या गरीब बिचाऱ्याचा आत्मा काही जाणत असावा. आणि तरीही आयुष्यभर त्याला सुरक्षित जागा सापडत नाही.

मी म्हणतो, “कात्या, आपण न्याहारी करू.”

ती थंडपणे बोलते, “नको. आभारी आहे.”

अजून एक मिनिट शांततेत जाते.

मी म्हणतो, “मला खार्कोव्ह आवडत नाही. फार करडे, अंधारे गाव आहे.”

“हो, कदाचित --- चांगले नाही. --- मी आता थांबत नाही --- मी चालले. आज मी परत जाईन.”

“कुठे?”

“क्रीमिया --- म्हणजे कॉकेशस.”

“किती दिवसांसाठी?’

“मला माहिती नाही.”

कात्या उठते आणि थंडपणे हसत, माझ्याकडे न बघता, माझ्या हातात हात देते.

मला विचारायचे आहे, ”म्हणजे तू माझ्या अंत्यसंस्काराच्या वेळी असणार नाहीस? पण ती माझ्याकडे बघत नाही. तिचा हात गार पडला आहे. मी मूकपणे तिच्याबरोबर दारापर्यंत जातो --- आता ती माझ्या खोलीतून बाहेर पडते व लांबलचक पॅसेजमधून, मागे वळून न बघता चालत रहाते. मी तिच्यामागे तिला बघत असल्याचे तिला माहिती आहे. बहुधा ती वळताना मागे बघेल.

पण नाही. ती मागे बघत नाही. तिचा काळा ड्रेस फडकताना मी शेवटचा पहातो. तिचा पदरवही नाहीसा होत जातो --- माझ्या आवडत्या मुली, अच्छा!

## अनुवादिकेची ओळख

# डॉ. वृषाली जोशी



B Sc, M A, M Ed, Ph D

२५ अनुवादित कथा मराठी मासिकामधून प्रसिद्ध झाल्या आहेत. ई साहित्यतर्फे तेवीस पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत.


मराठी व इंग्रजी माध्यमांच्या शाळाकॉलेजमध्ये अध्यापन केले आहे.


संशोधन प्रकल्पात सहभाग घेतला आहे.


कॉलेजमध्ये प्राचार्यपद भूषवले आहे.

सुगमसंगीत स्पर्धेत पारितोषिके, सिंथेसायझरवर गाणी वाजवण्याचा, कविता करण्याचा व शब्दकोडी बनवण्याचा छंद आहे.

संपर्क: वृषाली जोशी ७, अक्षय, २० तुळशीबागवाले कॉलनी पुणे ४११००९, चलभाष ९९२१७४६२४५














डॉ. वृषाली जोशी यांची पुस्तके




ज्या कव्हरवर क्लिक कराल
ते पुस्तक उघडेल
(नेट आवश्यक)





वृषाली जोशी
विश्वकथा१

वृषाली जोशी
विश्वकथा-२


वृषाली जोशी
विश्वकथा-३

वृषाली जोशी
विश्वकथा-४

वृषाली जोशी
साकीच्या कथा
HECTOR HUGH
MUNRO SAKI

THE PICTURE OF
DORIAN GRAY
द पिक्चर ऑफ
डोरिअन ग्रे
वृषाली जोशी
OSCAR WILDE


सॉमरसेट मॉम
मेजवानीपूर्वी
व इतर कथा
अनुवाद
वृषाली जोशी
BEFORE
THE PARTY

वृषाली जोशी
THE SHAKESPEARE
STORIES
4 BOOKS IN ONE
A MIDSUMMER NIGHT'S DREAM
THE MERCHANT OF VENICE
शेक्सपिअरच्या चार कथा
Much Ado about Nothing
Twelfth Night


शेरलॉक होम्स


भाग १ ते ८ (५० कथा)


ज्या कव्हरवर क्लिक कराल ते पुस्तक उघडेल












**ई साहित्य प्रतिष्ठानचे हे तेरावे वर्ष.**

**डॉ. वृषाली जोशी यांचे हे तेविसावे पुस्तक.**

डॉ. वृषाली जोशी या मराठी व इंग्रजी या भाषांच्या विद्वान आहेत. त्या प्राचार्य होत्या. त्यांनी काही काळ विदेशात राहून तेथल्या वाचन संस्कृतीचा अनुभव घेतला आहे. तशी वाचन संस्कृती महाराष्ट्रातही निर्माण व्हावी असे त्यांना वाटते. इंग्रजीतील उच्च दर्जाचे निवडक लेखकांचे साहित्य मराठीत अनुवाद करून मराठी वाचकांची अभिरूची संपन्न व्हावी यासाठी त्या अतोनात कष्ट घेतात. तसे पहाता अनुवादित पुस्तकांना अनेक व्यावसायिक प्रकाशकांकडून मागणी असते. परंतू मराठीतील जास्तीत जास्त वाचकांपर्यंत आपले साहित्य जावे म्हणून त्यांनी ई साहित्यची निवड आपल्या पुस्तकांसाठी केली आहे.

डॉ. वृषाली जोशी यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली सर्व पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले(९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर(९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद(९), अविनाश नगरकर(४), डॉ. स्मिता दामले(८), डॉ. नितीन मोरे (२८), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस

आल्मेडा(२), मधुकर सोनावणे(३), अनंत पावसकर(४), मधू शिरगांवकर (७), अशोक कोठारे (५० खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १७ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (८), डॉ. वृषाली जोशी(२३), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (८), अंकुश शिंगाडे(१०), आनंद देशपांडे(३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(३) स्वाती पाचपांडे(२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे(५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट(२), अरुण कुळकर्णी(८) असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी लेखक ई साहित्यच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये। विशेषीं लोकीं ’इ’यें।
दृष्टादृष्ट विजयें। होआवे जी।